# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०८ मार्च, २०२१ / फाल्गुन १७, १९४२ (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | उप मुख्यमंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री | |
| (३) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |
| (४) | ग्रामविकास मंत्री | |
| (५) | वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्ये मंत्री | |
| (६) | महिला व बालविकास मंत्री | |
| (७) | मृद व जलसंधारण मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८६**

---

## राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात सर्व संवर्गातील पदे भरण्याबाबत

**(१) * ६४४८ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात “अ”, “ब”, “क” व “ड” संवर्गातील आवश्यक असणारी एकूण मंजूर पदे किती आहेत, त्यापैकी १४००० पदे रिक्त असून सदर रिक्त पदे भरण्याबाबत अनेक संघटना व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढया मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याने कोविड व नॉन कोविड रुग्णांना सेवा मिळण्यास अडचणी येत असून कमी मनुष्यबळ असलेल्या कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत असल्याने सदर पद भरती तीन महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देश मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी संबंधित आरोग्य विभागाला दिल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाच्या ग्रामीण आरोग्य अहवालानुसार माहे जानेवारी, २०२१ नुसार ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांची ५० टक्के तर प्राथमिक आरोग्य केंद्रात ७ टक्के पदे रिक्त असल्यामुळे ग्रामीण जनतेला अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात गट “अ”, ”ब”, “क” व “ड” संवर्गात एकूण ५६,६९५ पदे मंजूर असून विविध संवर्गातील एकूण ३८,२९८ पदे भरलेली आहेत व १८३९७ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे आहे.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत गट “अ”, ”ब”, “क” व “ड” संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत २६,४८६ कंत्राटी पध्दतीने पदे भरण्यात आली आहेत.
(३) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या सन २०२० च्या ग्रामीण आरोग्य अहवालानुसार रुग्णालयात डॉक्टरांच्या पदांची कमतरता आहे तर प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर डॉक्टरांची कमतरता नाही.

तथापि, उपलब्ध वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांच्याकडून रुग्णसेवा दिली जाते. सबब, रुग्णांची गैरसोय होत नाही. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस दिलेले आहे. त्याव्दारे तसेच एनएचएम व आयपीएचएस या माध्यमातूनही कंत्राटी तत्वावर वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यात येतात.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील नामनिर्देशन कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असताना, मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास दिलेल्या स्थगितीनुसार सुधारीत आरक्षण निश्चिती करण्यात येत आहे. तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडेही मागणीपत्र पाठविण्यात आलेले आहे व पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी तसेच गट-ब मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची बिंदू नामावली आरोग्य सेवा आयुक्तालयस्तरावर अद्ययावत करण्यात येत आहे. कंत्राटी पध्दतीने वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीस देण्यात आले आहेत. एमबीबीएस शैक्षणिक अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत बीएएमएस शैक्षणिक अर्हताधारक उमेदवांराना कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच गट-ब मधील पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

गट-क व गट-ड मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) पंचायत समिती अंतर्गत बांधकाम साहित्य पुरवठा करण्याचा कंत्राट मर्जीतील कंत्राटदाराला दिल्याबाबत

**(२) * ६९०२ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) आर्वी (जि.वर्धा) पंचायत समिती अंतर्गत रुपये ४ कोटीचे बांधकाम साहित्य पुरवठा करण्याचा ४३ कामांचे कंत्राट मर्जीतील कंत्राटदाराला दिले गेल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सदर तक्रार कंत्राटदार संघटनेनी जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षात आर्वी जि.वर्धा पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायतीच्या कामासाठी साहित्याचे पुरवठा करण्यासाठी रुपये २५४ लक्ष इतक्या किंमतीची ई-निविदा प्रक्रिया संबंधित जिल्हा परिषदेकडून राबविण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रियेबाबत कंत्राटदार श्री.साईल कंस्ट्रक्शन व इतर यांनी दिनांक २२/१२/२०२० रोजी जिल्हा परिषदेस तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या चौकशीनुसार निविदे प्रक्रियेत १४ पुरवठादार सहभागी होते व सहभागी कंत्राटदाराची तांत्रिक छाननी अंती पूर्तता केल्यानंतर पात्र कंत्राटदारांना कंत्राट देण्यात आले.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घाटघर जलविद्युत (ता.शहापूर, जि.ठाणे) प्रकल्पातील कर्मचाऱ्यांनी लॉजिंग आणि बोर्डिंगची खोटी देयके सादर केल्याबाबत

**(३) * ६४८३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील घाटघर जलविद्युत प्रकल्पात सन २०१६ मध्ये एक वर्षाकरीता वरळी येथे पाटबंधारे विभागाकरीता कनिष्ठ लिपिक सेवा प्रवेशोत्तर वर्ग घेण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रशिक्षण काळामध्ये प्रवास आणि दैनिक भत्त्याची खोटी देयके सादर करुन तसेच ज्या ठिकाणी हे कर्मचारी वास्तव्यास होते तेथील काही ठिकाणी अस्तित्वात नसलेल्या लॉजिंग आणि बोर्डिंगची खोटी देयके सादर करुन शासनाच्या लाखो रुपयांचा अपहार केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाच्या लाखो रुपयांचा अपहार केलेल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सदर सेवा प्रवेशोत्तर वर्ग हे फक्त घाटघर जलविद्युत प्रकल्पाकरीता नसून, जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील क्षेत्रिय कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी कनिष्ठ लिपिक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले होते.
(२) व (३) सदर प्रकरणी काही प्रशिक्षणार्थीनी प्रवास व दैनिक भत्त्याची देयके सादर करताना सुट्टीच्या दिवशीचा दैनिक भत्ता, प्रवास भत्ता देयके सादर करण्यात आल्याचे तसेच लॉजिंग अनुज्ञेय नसताना लॉजिंगच्या देयकांची मागणी करुन प्रतिपूर्ती घेतल्याचे निदर्शनास आल्याने ज्या कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय नसलेल्या दिवसांचे दैनिक भत्त्याचे, लॉजिंगच्या देयकाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांकडून वसुली करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने संबंधित कर्मचारी व अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यासाठी गोदावरी खोऱ्यातील पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) * ६६०८ श्री.अंबादास दानवे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ३४०२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा जनता विकास परिषदेने दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक १७३/२०१३ नुसार मा.उच्च न्यायालयान, मुंबई यांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ रोजी चितळे आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चितळे आयोगाच्या शिफारशीनुसार पश्चिम वाहिन्या नद्यातुन समुद्राला तसेच गुजरातला जाणारे पाणी गोदावरी आणि तापी खोऱ्यात वळविण्याची शिफारस मा.उच्च न्यायालयान, मुंबई यांनी शासनास केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार १६८ अघफू पाणी गोदावरी खोऱ्यात सोडण्यात येणार होते त्यापैकी प्रत्यक्षात मराठवाड्यासाठी किती पाणी उपलब्ध करुन देण्यात आले,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) नाही.

जनहित याचिका क्रमांक १७३/२०१३ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये चितळे आयोगाच्या शिफारशीचा उल्लेख दिसून येत नाही.

(२) अंशत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या निर्णयामध्ये समन्वय समितीच्या माहे ऑगस्ट, २००१ च्या अहवालानुसार तापी व गोदावरी खोऱ्यात पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी वळविणेबाबत निर्देश दिलेले आहे. त्यानुसार २३ प्रवाही वळण योजनांबाबत एक वर्षाच्या आत कार्यवाही करणेबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार या २३ प्रवाही वळण योजनांपैकी १२ प्रवाही वळण योजनांची कामे भौतिकदृष्टया पूर्ण झालेली असून याव्दारे १२.६६३ दलघमी (०.४४७ अघफु) पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यात येत आहे. ५ योजनांची कामे बांधकामाधीन आहेत. १ योजनेचे काम अद्याप भूसंपादनाच्या अडचणीमुळे सुरु झालेले नाही. उर्वरीत ५ योजनांना मान्यता देणेबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) गोदावरी खोऱ्यातील दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी व गिरणा उपखोऱ्यासाठी कोकणामधुन पाणी वळविण्यासाठीच्या योजनांना तत्वत: मान्यता शासनाचे सुधारीत निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/(७५/२०१९)जसंअ, दिनांक १९/०९/२०१९ अन्वये देणेत आलेली आहे. यामध्ये उल्हास, वैतरणा, नारपार व दमणगंगा उपखोऱ्यातून १६८ अघफू पाणी उपलब्ध होणे अपेक्षित होते.

पश्चिमवाहिनी नदी खोऱ्यातील (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविणेसाठी एकात्मिक राज्य जल आराखड्यात अंतर्भूत असलेल्या योजनांचा प्राथमिक अभ्यास करणेसाठी शासन निर्णय दिनांक १७/०९/२०१९ अन्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करणेत आली आहे. सदर समितीने त्यांचा अहवाल दिनांक ३१/१०/२०१९ रोजी शासनास सादर केला आहे. त्यानुसार गोदावरी खोऱ्यात कोकणातील नार-पार, दमणगंगा, वैतरणा, उल्हास नदी खोऱ्यातून एकूण ८९.८५ पाणी वळविणेबाबत आखणी करून त्याबाबत शिफारस केली आहे. उपरोक्त पैकी २.४३ अघफू पाणी वळणाच्या पूर्ण/बांधकामाधीन योजना आहेत. १५.५५ अघफू पाणी वळणाबाबत पार-गोदावरी, नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व दमणगंगा-एकदरे-गोदावरी या दोन नदीजोड प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जल विकास प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेमार्फत तयार करण्यात येत आहे. ६१.८८ अघफू पाणी वळणाबाबतच्या योजनांचे सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.

सदर नदीजोड योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर प्रत्यक्ष लाभक्षेत्र निश्चिती व त्यानुषंगाने पाणी वापर निश्चित करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## भंडारा जिल्हा शासकीय रूग्णालयातील अतिदक्षता विभागात लागलेल्या आगीत बालकांचा मृत्यू झाल्याबाबत

**(५) * ६५४९ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.विलास पोतनीस, श्री.प्रसाद लाड, श्री.अंबादास दानवे, श्री.महादेव जानकर, श्री.सुरेश धस, श्री.रमेशदादा पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रामनिवास सिंह, श्री.संजय दौंड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हा शासकीय रूग्णालयातील अतिदक्षता विभागात दिनांक ९ जानेवारी, २०२१ रोजी शिशु केअर युनिटला लागलेल्या आगीत १० नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाला असून या रुग्णालयाचे फायर ऑडिट झाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शुक्रवारी रात्री दहापासून नवजात शिशु अतिदक्षता कक्षात कुणी डॉक्टर फिरकले नसून ड्युटीवरील परीचारिका कक्षाला बाहेरून कडी लावून गेली असल्यामुळे आत असलेल्या काही मातांनी आरडाओरड करुनही बाहेरून मदत मिळू शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आग दुर्घटना प्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालात नवजात शिशुकक्ष कर्मचाऱ्याविना असल्याचे नमूद केले असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या रूग्णालयात इलेक्ट्रीसिटी ऑडीट विभाग, अग्निप्रतिबंधक साधने व आपत्कालीन बाहेर जाण्याचा मार्ग नसून रुग्णालयातील सिव्हिल सर्जन यांनी उपकरणांसाठी शासनाकडे रुपये १.२० कोटीची मागणी केली असता निधी पुरविला गेला नाही व अग्निशमनासंबंधीच्या नियमावलीकडे दुर्लक्ष करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू आग लागण्यामागची कारणे काय आहेत व आगीत मृत्यू पावलेल्या बालकांच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली आहे,

(६) असल्यास, या रुग्णालयात आग नियंत्रण व सुरक्षा नियमावलीनुसार सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मंजूर झाला असतानाही निधी अभावी त्याची अंमलबजावणी करण्यात आली नव्हती, तसेच सदरील घटनेची दखल घेऊन राज्यातील सर्वच रुग्णालयांचे फायर ऑडिट व इतर सुरक्षा ऑडिट करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी निष्काळजीपणा करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई करुन यापुढे रूग्णालयात व शाळेत अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हा रुग्णालय भंडारा येथील एसएनसीयुमध्ये दिनांक ०९/०१/२०२१ रोजी ऑऊटबॉर्न कक्षामध्ये १० नवजात शिशु व इनबॉर्न कक्षामध्ये ७ नवजात शिशु दाखल होते. यापैकी इनबॉर्न युनिटमधील ७ नवजात शिशुंना वाचविण्यात यश आले परंतु आऊटबॉर्न युनिट मधील १० बालकांचा मृत्यू झाला.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) होय, हे अंशत: खरे आहे.

रुग्णालयात Fire extinguisher उपलब्ध करुन देण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ अन्वये सी.सी.टी.व्ही.साठी रुपये ४५ लक्ष व फायर फाईटींग सिस्टीम बसविण्यासाठी रुपये ९०.०० लक्ष च्या अंदाजपत्रक व आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिली होती.

त्यानंतर आयुक्त आरोग्य सेवा यांच्या दिनांक १०/०२/२०२१ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावास शासन निर्णय दिनांक २२/०२/२०२१ अन्वये आगप्रतिबंधक यंत्रणा बसविण्यासाठी रुपये १,९२,९५,८४४/- किंमतीच्या अंदाजपत्रक व आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे व सन २०२१-२०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये रुपये १,९२,९५,८४४/- निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे.

(५) मृत्यू पावलेल्यांच्या प्रत्येक कुटुंबाला शासनाने खालीलप्रमाणे मदत दिली आहे.

१) मुख्यमंत्री निधी रुपये १ लक्ष.

२) आपत्ती व्यवस्थापन रुपये ४ लक्ष.

३) राज्यपाल सहायता निधी रुपये २ लक्ष.

४) प्रधानमंत्री सहायता निधी रुपये २ लक्ष.

(६) हे खरे नाही.

आयुक्त आरोग्य सेवा यांच्या दिनांक १०/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावास शासन निर्णय दिनांक २२/०२/२०२१ अन्वये आगप्रतिबंधक यंत्रणा बसविण्यासाठी रुपये १,९२,९५,८४४/- किंमतीच्या अंदाजपत्रक व आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे व सन २०२१-२०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये रुपये १,९२,९५,८४४/- निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे.

(७) चौकशी केली आहे व त्यानुसार जिल्हा शल्य चिकित्सक, वैदयकीय अधिकारी यांना निलंबित केले आहे, कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेले बालरोग तज्ञ व २ स्टाफ नर्स यांचे सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत व अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक यांची बदली करण्यात आली आहे.

१) रुग्णालयात व प्रा.आ. केंद्रात fire extinguisher बसविण्यात आले व त्याव्दारे आगीवर प्रतिबंधात्मक उपाय करण्यात येतात.

२) नवीन बांधकाम होणाऱ्या रुग्णालयात Fire NOC व इतर Statutory NOC असल्याशिवाय हस्तांतरीत होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३) सर्व रुग्णालयाचे आणि प्रा.आ. केंद्राचे फायर ऑडिट करण्याबाबत आणि इलेक्ट्रीक ऑडिट करण्याबाबत सर्व स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. सदर ऑडिट नुसार सा.बा. विभागामार्फत अंदाजपत्रके जिल्हास्तरावरुन तयार करुन जिल्हा नियोजन समितीला प्रस्ताव निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यात येत आहेत. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

४) रुग्णालयात फायर ड्रील घेण्यात येत आहेत.

सर्व रुग्णांलयाचे फायर ऑडिट, Structure Audit, Electric Audit, Mock Drill, Fire NOC प्राप्त करुन घेणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यात बालविवाहाच्या प्रमाणामध्ये वाढ झाल्याबाबत

**(६) * ६३४३ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक ४८२४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना महामारीच्या काळात महिला व बालविकास विभागाने माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार बालविवाहाच्या घटनांमध्ये सन २०२०-२०२१ मध्ये माहे एप्रिल, २०२० ते

ऑगस्ट, २०२० यादरम्यान सन २०१९-२०२० च्या तुलनेत बालविवाह घटनांमध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास आले असून शासकीय यंत्रणेने नोंदवलेल्या घटनांपेक्षा अधिक घटना घडल्याबाबतचा तज्ञांचा अहवाल अप्राप्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्हयात चाईल्ड लाईन या संस्थेने एका १५ वर्षीय मुलीचा बालविवाह रोखल्याची घटना माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून वाशिम जिल्हयातील ग्रामीण भागात बालविवाहांचे वाढते प्रमाण लक्षात घेता सदर प्रकरणाकडे ग्रामसेवक व गावच्या पाटीलांचे दुर्लक्ष होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बालविवाह रोखण्याबाबत तसेच तज्ञांचा अहवाल प्राप्त होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) राज्यात कोरोना महामारीच्या काळात सन २०२०-२०२१ मध्ये माहे एप्रिल, २०२० ते ऑगस्ट, २०२० यादरम्यान सन २०१९-२०२० च्या तुलनेत बालविवाह घटनांमध्ये वाढ झालेली आहे. तथापि, शासकीय यंत्रणेने नोंदविलेल्या घटनांपेक्षा अधिक घटना घडल्याबाबतचा तज्ञांचा अहवाल अप्राप्त आहे.

(२) होय, हे खरे आहे. दिनांक २१/१२/२०२० रोजी नांदेड जिल्हयात चाईल्ड लाईन या संस्थेने एका १५ वर्षीय मुलीचा बालविवाह रोखला आहे.

वाशिम जिल्हयातील संबंधित गावातील ग्रामसेवक तथा बालविवाह प्रतिबंध अधिकारी, आणि संबंधित गावाचे पोलीस पाटील यांनी बालविवाह प्रतिबंध कायद्यांतर्गत प्रचार प्रसिध्दी पडताळणी आणि बालविवाह होत असल्यास कार्यवाही करणे अपेक्षित असताना जोपर्यंत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाकडून कार्यवाहीसाठी त्या गावात पथक गेलेले नाही तो पर्यंत ग्रामसेवक किंवा पोलीस पाटील हे या प्रकरणी अनभिज्ञ असतात असे या जिल्हयात निदर्शनास आलेले आहे.

(३) बालविवाह रोखण्याकरीता बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी याकरीता जिल्हा बाल संरक्षण कक्ष, समुपदेशक, संरक्षण अधिकारी यांचेमार्फत ग्रामीण भागात एकूण ६९८ गाव बाल संरक्षण समिती व ६ तालुक्यात तालुका बाल संरक्षण समितीची स्थापना करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८/१/२०२१ रोजीच्या जिल्हा बाल संरक्षण समितीच्या बैठकीमध्ये त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार बालविवाह प्रतिबंध अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणीकरीता अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, ग्रामसेवक इत्यादीचे प्रशिक्षण व कार्यशाळा आयोजित करणेबाबत सूचित करण्यात आले आहे. याकरीता सर्व संबंधित यंत्रणांनी आपले स्तरावर प्रचार व प्रसिध्दी करणेबाबत निर्देश देण्यात आले. तसेच ग्रामस्तरावर प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांचे फलक दर्शनिय भागात लावण्याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत व गटविकास अधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त लग्न पत्रिका छपाई करणारे, प्रिंटींग प्रेस, रिती रिवाजानुसार लग्न लावून देणारे भटजी, भंतेजी, मौलाना, मंडप डेकोरेशन, वाजंत्री यांनी लग्नापूर्वी वधू वराच्या वयाची पडताळणी करावी अशी प्रचार प्रसिध्दी आणि बाल कल्याणासाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था व संबंधित शासकीय यंत्रणा यांना निमंत्रित करुन त्यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. तसेच बालविवाह रोखण्याबाबत महाविद्यालय, शाळा, समाजकार्य महाविद्यालय, बस स्थानक, वृत्तपत्र इत्यादी ठिकाणी प्रचार प्रसिध्दी करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठी पत्रकारितेचे जनक व दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मारकाच्या कामाबाबत

**(७) * ६८२७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी पत्रकारितेचे जनक व दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मारकाच्या कामाची मंजुरी जिल्हा वार्षिक योजनेतून मा.वित्त मंत्री यांनी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा नियोजन समितीमध्ये निधीची कमतरता असल्याने तसेच दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे स्मारक उच्च दर्जाचे करावयाचे असल्याने जिल्हा नियोजन समिती ऐवजी राज्यस्तरीय स्मारक निधीमधून निधी घेण्याबाबत मंजुरी देऊन निधी उपलब्ध करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाव्दारे मा.वित्त मंत्री यांना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू स्मारकाचे काम राज्यस्तरीय स्मारक निधीमधून करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१), (२), (३) व (४) दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर याचे स्मारक दुरुस्तीचे कामकाज त्वरीत करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी राज्यस्तरावरुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांच्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८) * ६७८३ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये यावर्षी हिरक महोत्सव साजरा होत असून त्यानिमित्ताने सन २०२१-२०२२ मध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन रुग्णालयातील विकास कामे करण्यात येणार आहेत तसेच स्पाईन ॲण्ड स्पोटर्स् सेंटर उभारण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## पालघर जिल्हा परिषदेत अनुकंपा भरतीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(९) * ६९४० श्री.सुरेश धस : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक ५४६१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेत सन २०१७ मध्ये कोणतीही सरळ सेवा भरती नसताना वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागाच्या सूचना विचारात न घेता अनुकंपा तत्वावरील ४४ पदांची तर १०% ग्रामपंचायत कर्मचारी भरतीमध्ये २३ अतिरिक्त पदांची भरती केल्याने या भरतीमध्ये अनियमितता झाल्याचे सिध्द झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुकंपा भरती करीत असताना जिल्हा परिषदेकडून उमेदवारांच्या याद्या ह्या ज्येष्ठतेनुसार अंतिम करण्यात आल्या नव्हत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुकंपा भरती केलेल्या ज्या उमेदवारांनी विहित मुदतीत अर्ज सादर केले नव्हते अशा उमेदवारांचा विलंब क्षमापित करण्याचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना सादर केला असून तो मान्य करण्यात आला आहे काय,
(४) तसेच, अनुकंपा भरती विषयी स्वतंत्र विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय.
(२) होय.
(३) होय, विभागीय आयुक्त कार्यालयाने सुधारित प्रस्ताव सादर करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना सूचना दिलेल्या आहेत.
(४) प्रस्तुत प्रकरणास जबाबदार असलेले कनिष्ठ प्रशासन अधिकारी श्री.प्रमोद भास्करराव कहू व वरिष्ठ सहाय्यक श्री.रमेश दत्तात्रय पवार यांची विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचेस्तरावर विभागीय चौकशी सुरु आहे.
(५) होय.
सदरची बाब न्यायप्रविष्ट असून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील आषाढी यात्रा सोहळयासाठी पालखी मार्गावरील ग्रामपंचायतींना विशेष निधी देण्याबाबत

**(१०) * ७२५७ श्री.प्रशांत परिचारक, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील आषाढी यात्रा सोहळयासाठी पालखी मार्गावरील ग्रामपंचायतींना विशेष निधी दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यःस्थितीत ६३ ग्रामपंचायतींना दिला जाणारा रुपये २ कोटी ४५ लाख इतका निधी अद्यापही न मिळाल्याने ग्रामपंचायतींची आर्थिक नियोजनाअभावी विकास कामे होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांना तात्काळ निधी वितरित करण्याचे आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) याप्रकरणी शासनाच्या दिनांक २६/२/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये निधी वितरित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भ व मराठवाडा येथील मागास भागाचा अनुशेष दूर करण्याबाबत

**(११) * ७४२१ श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ व मराठवाड्याच्या विकासासाठी केवळ ५० टक्के निधी वितरित करण्यात आल्यामुळे येथील अनुशेषाचा प्रश्न गंभीर झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भ व मराठवाडा येथील मागास भागाचा अनुशेष दूर करण्यासाठी स्थापन झालेल्या विदर्भ विकास मंडळाला शासन मुदतवाढ देत नसून इतर विभागांपेक्षा विदर्भ हा सिंचन, रस्ते, कृषी पंपाचे ऊर्जीकरण व विजेचा वापर इत्यादी प्रमुख क्षेत्रात मागे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, शैक्षणिक, आर्थिक व सामाजिकदृष्टया मागास असून मराठवाडा विभागाचा अनुशेष पूर्ण झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विदर्भ व मराठवाडा विकास मंडळांचे पुनर्गठन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्याची सद्य:स्थिती काय आहे व याबाबत कोणता निर्णय घेतला व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) आर्थिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये “कोविड-१९” विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या अप्रत्याशित परिस्थितीत अत्यंत कमी महसूल प्राप्त होत असल्याने राज्यस्तरीय योजनांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, अन्न व नागरी पुरवठा व मदत व पुनर्वसन विभाग या प्राधान्यक्रम दिलेल्या ५ प्रशासकीय विभाग वगळता इतर सर्व प्रशासकीय विभागाकरीता कार्यक्रम खर्च अंतर्गत निधीपैकी फक्त ३३% पर्यंत निधी उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, राज्याच्या आर्थिक स्थितीला पुन्हा चालना देण्यासाठी रोजगार निर्मिती व मत्ता निर्मितीस चालना देणे व अर्थव्यवस्था पुन्हा रूळावर आणण्यासाठी निधी अपुरा पडू नये याकरीता भांडवली खर्च करणारे १७ प्रशासकीय विभागाकरीता त्यांच्याकडील भांडवली लेखाशीर्षांतर्गत सन २०२०-२०२१ साठी ३३% मर्यादा वाढवून ७५% पर्यंत अर्थसंकल्पीय नियतव्यय उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. याशिवाय आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत

१००% निधी वितरित करण्यात आलेला आहे. तसेच, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण/अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती घटक कार्यक्रम) या अंतर्गतचा निधी १००% वितरणास मान्यता देण्यात आलेली आहे.
(२), (३) व (४) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांचा कालावधी दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी संपुष्टात आला असल्याने या तीनही विकास मंडळांचे पुनर्गठण करण्याबाबतचा प्रस्ताव सध्या शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच, निर्देशांक व अनुशेष समितीने माहे मार्च, १९९४ चा दर्शविलेल्या वित्तीय अनुशेषाचे निर्मुलन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील कर चुकवेगिरी करणाऱ्या बनावट कंपन्या व दोर्षींविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(१२) * ६९५९ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथे ३० बनावट कंपन्या स्थापन करून या कंपन्यांनी वस्तू व सेवा कराचे रुपये १८५ कोटी बुडविल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी दिलीपकुमार टिबरेवाल यांस मालाड येथून माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कर चुकवेगिरी करणाऱ्या बनावट कंपन्या व दोर्षींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, वस्तू व सेवाकर विभागाकडून करण्यात येत असलेल्या अन्वेषण कार्यवाही दरम्यान आरोपी श्री.दिलीपकुमार टिबरेवाल यांच्या स्वत:च्या नावे चार कंपन्या/फर्म असल्याचे दिसून आले. सदर कंपन्या/फर्म मध्ये आरोपी श्री.दिलीपकुमार टिबरेवाल यांची पत्नी श्रीमती

प्रिती टिबरेवाल या संचालक/मालक (प्रोप्रायटर) असल्याचे दिसून आले तसेच, श्री.दिलीपकुमार टिबरेवाल यांच्याव्दारे संचालित इतर २६ फर्म वस्तू व सेवाकर कायद्यांतर्गत नोंदीत असल्याचे आढळून आले आहे. उक्त अन्वेषण दरम्यान आरोपी श्री.दिलीपकुमार टिबरेवाल यांनी सदर ३० कंपन्या/फर्म स्वत: संस्थापित/संचालित केल्या असल्याचे दिसून आले आहे. आरोपी श्री दिलीपकुमार टिबरेवाल यांनी अशा ३० कंपन्या/फर्मव्दारे वस्तू व सेवाकर अधिनियमांतर्गत नोंदणी घेऊन प्रत्यक्ष वस्तू व सेवा यांची कोणतीही देवाण घेवाण न करता बनावट बिजके दिली असल्याचे उघड झाले आहे. सदर बनावट विक्री बिजकाच्या आधारे आरोपी श्री.दिलीपकुमार टिबरेवाल याने रुपये १८५ कोटी एवढ्या रक्कमेचा इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ इतरांना पोहचविल्याचेही उघड झाले आहे.

(२) श्री.दिलीपकुमार टिबरेवाल या आरोपीस दिनांक २३/११/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.

(३) होय, वस्तू व सेवाकर विभागाच्या अन्वेषण शाखेकडून सदर प्रकरणाचे अन्वेषण सुरु असून आता पर्यंत मुद्दा क्र.१ व २ मध्ये नमूद कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच रुपये १०.१० कोटी इतक्या रकमेची वसुली केली आहे.

(४) दोषींवर कार्यवाहीमध्ये विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी यांना कायमस्वरूपी नियुक्त्या देण्याबाबत

**(१३) * ६३५४ श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.जयंत पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध शासकीय रुग्णालयात ४८० वैद्यकीय अधिकारी हे स्थायी पदावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्तीवर असून या रुग्णालयातील अपघात विभाग, प्रशासन कोर्ट कॉल अशा जबाबदाऱ्या पार पाडत असतानाही या डॉक्टरांना सेवेत कायमस्वरूपी नियुक्त करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयाच्या आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्त करण्याचा अधिकार महाविद्यालयाच्या अधिष्ठात्यांना असून त्यानुसार त्यांच्यामार्फत या पदावर नियुक्त्या केल्या जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थायी पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त करण्यात आल्यानंतर काम व अनुभवाच्या अनुषंगाने सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांची कायमस्वरूपी नियुक्ती होत नसल्याने त्यांनी मा.मुख्यमंत्री मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री व मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुभव असूनही कायमस्वरूपी डॉक्टरांपेक्षा मिळणारा कमी पगार तसेच कोणतेही भत्ते व अन्य सवलती दिल्या जात नसल्यामुळे त्यांच्यात असंतोष पसरला असून त्यांनी दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजीपासून पुढील आठ दिवस काळ्या फिती लावून काम करण्याचा व दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी काम बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर वैद्यकीय अधिकारी यांना कायमस्वरूपी नियुक्त्या न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उपरोक्त ४८० वैद्यकीय अधिकारी यांना स्थायी पदावर कायमस्वरूपी नियुक्त्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

(२) वैद्यकीय अधिकारी पदावर तात्पुरत्या नियुक्त्या करण्याचा अधिकार त्या-त्या वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखालील विभागीय निवड मंडळास आहेत.

(३) खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.

(५) तात्पुरत्या सेवा नियमित करण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय तसेच मा.उच्च न्यायालयांनी विविध प्रकरणात पारित केलेल्या न्याय निर्णयानुसार प्रस्थापित झालेल्या वैधानिक निर्बंधामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्यासंदर्भात अडचणी आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कोरोनाची साथ नियंत्रणात आणण्यासाठी करावयाच्या लसीकरणाबाबत

**(१४) * ६५६३ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे मार्च, २०२० ते दिनांक १५ जानेवारी, २०२१ पर्यंत किती कोरोनाबाधित रुग्ण आढळले, त्यापैकी किती रुग्ण कोरोनामुक्त झाले, किती कोरोनाबाधितांचा मृत्यू झाला व किती कोरोना रुग्णांवर उपचार सुरु आहेत,

(२) असल्यास, केंद्र शासनाने कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी सर्व राज्यात कोरोना लसीकरणाची परवानगी दिल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या लसीची परिणामकारकता व सुरक्षितता सिध्द होण्याआधीच तिला मान्यता दिली असून लसीच्या उपयुक्ततेच्या दाव्यांची तपासणी विविध पातळ्यांवर होणे, औषध क्षेत्रातील संस्थांना नवीन औषध/लसीचे प्रबंध सादर करणे व त्यानंतर त्या क्षेत्रातील तज्ञांकडून त्याची छाननी होणे आदी प्रक्रिया या लसीबाबत पूर्णत्वास गेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली टास्क फोर्ससारखी यंत्रणा तयार करून लसीकरणानंतर दुष्परिणाम झाल्यास उपचाराची पूर्वतयारी करण्यात आली आहे काय तसेच, कोरोनाची बनावट लस देखील बाजारात येण्याची शक्यता असून त्यावर नियंत्रण ठेवण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,
(५) असल्यास, राज्यात सर्वांना मोफत लसीकरण देण्याबाबत मागणी होत आहे त्यानुसार कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोरोना लसीकरण करण्यासाठी कोणते नियोजन केले वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) राज्यात मार्च, २०२० ते दिनांक १५ जानेवारी, २०२१ पर्यंत कोविड-१९ चे एकूण १९,८४,७६८ रुग्ण आढळले, त्यापैकी १८,८१,०८८ रुग्ण कोविड मुक्त झाले असून एकूण ५०,३३६ रुग्णांचा या आजारामुळे मृत्यू झाला आहे. दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी राज्यात ५२,१५२ रुग्णांवर उपचार सुरु होते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

कोविड-१९ लसीकरणासाठी राष्ट्रीय तज्ञ चमुने (NEGVAC) ठरविल्याप्रमाणे व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कोविड-१९ लस परिणामकारक व सुरक्षित असल्याचे नमूद केले आहे.
(४) होय.

दुष्परिणामाच्या उपचाराची पूर्व तयारी केली आहे. लसीकरण सत्राच्या ठिकाणी लसीकरणानंतरची प्रतिकूल घटना घडल्यास त्वरित उपचारांसाठी Anaphylactic Kit व AEFI Management Kits उपलब्ध आहेत, सद्य:स्थितीत केवळ केंद्र शासनाकडून पुरवठा होणाऱ्या लसीव्दारे लसीकरण करण्यात येत आहे.

(५) सद्य:स्थितीत शासकीय आरोग्य संस्थामध्ये मोफत लसीकरण करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद व लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील रिक्त पदे भरणेबाबत

**(१५) * ६४७२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) ची स्थापना सन १९५६ मध्ये झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात वर्ग-१ ते वर्ग-४ ची मंजूर पदे २३०० असून भरलेली पदे १७२५ तर रिक्त पदे ५७५ आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अतिविशेषोपचार रुग्णालय, औरंगाबाद येथील गट-अ ते गट-ड ची २१९ पदे व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथे २२३ पदास दिनांक ८ जानेवारी, २०२१ रोजीच्या शासन आदेशान्वये मान्यता दिली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अंतर्गत शासकीय कर्करोग रुग्णालयात गट-अ ते गट-ड च्या ३६० पदांना दिनांक ६ जानेवारी, २०२१ च्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रुग्णालयातील मंजूर असलेली रिक्त पदे भरण्याबाबत तसेच स्वतंत्र लेखाशीर्ष करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) होय.

(२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद या संस्थेमधील मंजूर २२०७ पदांपैकी १३३९ पदे भरलेली असून ८६८ पदे रिक्त आहेत.

(३) होय.

(४) होय.

(५) व (६) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद या संस्थेतील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच अतिविशेषोपचार रुग्णालय, औरंगाबाद करीता स्वतंत्र लेखाशीर्ष मंजूर करण्याची बाब विचाराधीन आहे.

-----------------

## वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाकडे औषध वितरकांची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(१६) * ७४८४ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या खरेदी व विक्री कक्षाकडून आलेल्या मागणीनुसार वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाकडून (डीएमईआर) सन २०१९-२०२० मध्ये कोट्यवधींची औषधे निविदा प्रक्रियेतून वितरकांकडून खरेदी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शासकीय रुग्णालयांना औषध पुरवठा करणाऱ्या औषध वितरकांची रुपये १०३ कोटींची रक्कम शासनाकडे प्रलंबित असून सदरहू औषधांची कोट्यवधीची देयके मंजूर करण्यात न आल्याने राज्यातील १०० पेक्षा अधिक औषध वितरकांनी शासनाला होणारे औषध वितरण थांबविले असून नवीन निविदा प्रक्रियेत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक १४ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने औषधांची देयके मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दिनांक २६/०७/२०१७ नुसार औषधे व तद्नुषंगिक बाबींची खरेदी व वितरण हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ, मुंबई यांच्याकडून करण्यात येते.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षामध्ये हाफकिन महामंडळाने पुरवठा केलेली औषधे व संचालनालयास प्रत्यक्ष प्राप्त झालेली औषधी याबाबत संचालनालय व हाफकिन महामंडळ यांच्यास्तरावर संयुक्त छाननी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कलावंतांना वृध्दापकाळात निवृत्तिवेतन देण्याबाबत

**(१७) * ७०७५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रशांत परिचारक, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके** : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कलेवर उदरनिर्वाह करणाऱ्या वृध्द कलावंतांना निवृत्तिवेतन देण्याचे शासनाचे धोरण असतानाही मागील ३ वर्षात लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी असल्याची बाब दिनांक २० डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरेशा प्रसिध्दीअभावी तसेच किचकट प्रक्रियेमुळे कार्यरत असलेल्या विशेष निवड समितीकडे प्रत्येक वर्षी कमी प्रमाणात अर्ज प्राप्त होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यात मागील ३ वर्षांत फक्त ५१ वृध्द कलावंतांना आर्थिक मदत देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रक्रिया सुलभ करुन जास्तीत जास्त वृध्द कलावंतांना या योजनेचा लाभ मिळण्याबाबत व सदर योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यातील सन्मानार्थी वृध्द साहित्यिक व कलावंत मानधन योजनेंतर्गत डिसेंबर, २०२० पर्यंतचे सुमारे २८,००० पात्र सन्मानार्थी वृध्द साहित्यिक व कलावंतांना मानधन अदा करण्यात आलेले आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ अन्वये सन्मानार्थी वृध्द साहित्यिक व कलावंत मानधनात दीडपट वाढ करण्यात आली असून प्रतिवर्षी प्रतिजिल्हा सन्मानार्थी निवड इष्टांक ६० वरुन १०० इतका करण्यात आलेला आहे.

या योजनेंतर्गत संबंधित जिल्हास्तरीय निवड समिती विषयांकित मानधनास पात्र ठरणाऱ्या वृध्द साहित्यिक व कलाकार यांची निवड करीत असते.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

ठाणे जिल्ह्यात सदर योजनेकरीता सन्मानार्थी वृध्द साहित्यिक व कलाकार यांचे कमी प्रमाणात प्रस्ताव प्राप्त झाल्याने, प्राप्त प्रस्तावानुसार मागील ३ वर्षात ५१ सन्मानार्थी वृध्द साहित्यिक व कलाकारांना मानधन मंजूर करण्यात आले आहे.

सदर योजना प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीकोनातून वृध्द साहित्यिक व कलाकारांचे जास्तीत-जास्त प्रस्ताव प्राप्त होण्यासाठी जिल्हास्तरावर व तालुका स्तरावर या योजनेची प्रसिध्दी व प्रचार करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणातील लघु व मध्यम सिंचन प्रकल्पाची कामे पूर्ण करुन पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्याबाबत

**(१८) * ६९८२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील ५ प्रकल्प, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ७ प्रकल्प, रत्नागिरी जिल्ह्यातील ७ प्रकल्प व पालघर जिल्ह्यातील ३ प्रकल्प असे एकूण २२ मध्यम प्रकल्प तर १०० लघु प्रकल्पांची कामे गेली २० ते २२ वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणात पावसाचे पाणी अडवण्याची, साठवण्याची व जिरवण्याची आवश्यक ती पुरेशी व्यवस्था नसल्याने अनेक भागात पाणी टंचाईचा प्रश्न निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सर्वाधिक पाऊस कोकणात पडत असून रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर व ठाणे जिल्ह्यात पावसाचे पाणी साठविण्यासाठी लघु व मध्यम सिंचन प्रकल्पांची कामे करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोकणातील लघु व मध्यम सिंचन प्रकल्पांची कामे पूर्ण करुन पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

कोकण प्रदेशांतर्गत सद्य:स्थितीत ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर व नाशिक (अंशत:) या जिल्ह्यातील एकूण ४ मोठे, ११ मध्यम व ३७ लघु अशा एकूण ५२ पाटबंधारे प्रकल्पांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(२) कोकण प्रदेशांतर्गत १ मोठा, ४ मध्यम, १५९ लघु व ३ उपसा सिंचन असे एकूण १६७ प्रकल्प पूर्ण असून त्याव्दारे ७४५.७० द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण करण्यात आला आहे. तसेच ४ मोठे, ११ मध्यम व ३७ लघु पाटबंधारे बांधकामाधीन प्रकल्पाव्दारे २३७८.८३ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण करण्यात आला आहे. सर्व बांधकामाधीन प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उर्वरित १११८.५४ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण होणार आहे.
(३) होय.
(४) बांधकामाधीन प्रकल्पांची कामे निधी उपलब्धतेनुसार लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच मंजूर पश्चिम वाहिनी नदी खोरे जल आराखड्यात प्रस्तावित असलेल्या भविष्यकालीन प्रकल्पांची कामे निधी उपलब्धतेनुसार टप्याटप्याने हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोहा, मुदखेड, मुखेड व धर्माबाद (जि.नांदेड) येथील राजीव गांधी किशोरी सशक्तीकरण योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९) * ६७३१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहा, मुदखेड, मुखेड व धर्माबाद (जि.नांदेड) येथील एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन राजीव गांधी किशोरी सशक्तीकरण योजनेमध्ये लाखो रुपयांचा अपहार केला असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि) जिल्हा परिषद नांदेड यांचेकडील प्राप्त अहवालानुसार प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून सदर चौकशीअंती राजीव गांधी सबला योजनेंतर्गत किशोरवयीन मुलींचे प्रशिक्षण संबंधित पर्यवेक्षिका यांनी घेतल्याचे आढळून आले असून यात कोणताही अपहार झालेला नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील अनेक वाड्या-वस्त्या मूलभूत सोयी सुविधापासून वंचित असल्याबाबत

**(२०) * ६५१५ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील अनेक वाड्या-वस्त्या मूलभूत सोयी सुविधांपासून वंचित राहिल्या असून यामध्ये प्रामुख्याने अनेक धनगरवाड्यांचाही समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यातील काही वाड्यांवर बारमाही रस्ते नसल्याने ग्रामस्थांसह शाळकरी विद्यार्थ्यांना हिंस्त्र प्राण्यांचा मुकाबला करीत शाळेला जावे लागते. फये गावापासून तीन ते चार कि.मी. अंतरावर असलेल्या शेळकेवाडी, लिंगाचीवाडी, हंड्याचा वाडा, कळकीचा वाडा या धनगरवाड्यांना देखील याच समस्यांचा सामना करावा लागत असून या ठिकाणी रस्ता नसल्याने तेथील लोकांना पायवाटेने फये येथे यावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पावसाळ्यात या भागात लोकांची बिकट अवस्था होत असून आजारी रुग्णांना पाळणा करून आणावे लागते यामुळे अनेकांना वेळेवर वैद्यकीय सुविधा न मिळाल्याने जीवही गमवावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सदरहू भागात मूलभूत सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे. आरोग्य विभागामार्फत नियमित वैद्यकीय सुविधा देण्यात येतात. परंतु, पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे वैद्यकीय सुविधा देताना अडचणी निर्माण होतात.
(४) वीज व पाणी याबाबत सुविधा दिली आहे. रस्त्याची जागा वन विभागाच्या अखत्यारित असल्याने याप्रकरणी ग्रामपंचायत फये यांनी वन विभागाकडे परवानगी मागितली आहे.
(५) वन विभागाच्या परवानगी अभावी विलंब होत आहे.

-----------------

## केंद्रीय पातळीवरील नीट, राज्य पातळीवर एमएचटी-सीईटी या सामाईक प्रवेश परीक्षेच्या जाहीर केलेल्या शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबत

**(२१) * ६६४३ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शैक्षणिक वर्ष सन २०१४-२०१५ पासून राज्यातील प्रथम वर्ष आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे प्रवेश वैद्यकीय संचालनालयामार्फत आयोजित एमएचटी-सीईटी या प्रवेश परीक्षेच्या गुणवत्तेच्या आधारे प्रवेश प्रक्रिया राबवून करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष सन २०१६-२०१७ पासून राज्यातील शासकीय अनुदानित आणि महानगरपालिका यांच्या अखत्यारीतील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे प्रवेश राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या राज्य पातळीवरील सामाईक प्रवेश परीक्षेच्या आधारे करण्यास मान्यता देण्यासाठी शासनाने दिनांक ३१ मे, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून तद्नुसार शैक्षणिक वर्ष सन २०१६-२०१७ पासून राज्य पातळीवरील सामाईक प्रवेश परीक्षेच्या आधारे भरण्यात येणाऱ्या

राज्यातील शासकीय अनुदानित आणि महानगरपालिका यांच्या अखत्यारीतील, तसेच अनुदानित अल्पसंख्याक संस्थातील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या (MBBS आणि BDS अभ्यासक्रम वगळून) प्रवेशांच्या जागा १०० टक्के अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने टी.एम.ए.पै. विरुध्द कर्नाटक शासन याचिका क्र. ३१७/९३ या प्रकरणी दिनांक ३१ ऑक्टोबर, २००२ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या पदवी, पदव्युत्तर आणि विशेषोपचार अभ्यासक्रमांबाबत शैक्षणिक धोरण निश्चित करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाने दिनांक ५ एप्रिल, २००३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात सर्व अल्पसंख्याक संस्थांमध्ये ५० टक्के जागा अल्पसंख्याकांसाठी व ५० टक्के जागा बिगर अल्पसंख्यांकांसाठी आरक्षणासहित राहतील, असे नमूद करण्यात आले असतानाही त्याची दखल उपरोक्त शासन निर्णय निर्गमित करतांना शासनाकडून घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू शासन निर्णयामुळे गत ४ वर्षापासून राज्यातील खुल्या व मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांवर प्रवेश प्रक्रियेत अन्याय होत असल्याने सदरहू शासन निर्णयातील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करणाऱ्या तरतुदीत सुधारणा करून सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याबाबतचे लेखी निवेदन मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री व सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाने शैक्षणिक वर्ष सन २०१६-२०१७ पासून प्रथम वर्ष आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय पातळीवरील नीट, राज्य पातळीवर एमएचटी-सीईटी या सामाईक प्रवेश परीक्षेच्या आधारे करण्यास मान्यता देण्याबाबत दिनांक ३१ मे, २०१६ रोजी जाहीर केलेल्या शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) होय, हे खरे आहे. सन २०१४-२०१५ ते २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षाकरीता आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या राज्यस्तरीय कोट्याचे प्रवेश हे राज्य शासनामार्फत आयोजित एमएचटी-सीईटी या राज्य सामाईक प्रवेश परीक्षेच्या गुणवत्ता यादीमार्फत करण्यात येत होते.

(२) होय, शासनाने दिनांक ३१ मे २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

(३) राज्य शासनामार्फत महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ हा कायदा दिनांक १७/०८/२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. तसेच या अधिनियमातील तरतुदीनुसार खाजगी विनाअनुदानित संस्थातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेशासंदर्भात प्रवेश नियम देखील प्रसिध्द करण्यात आले आहेत. दिनांक ३१ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये विवक्षितपणे नमूद केलेल्या नियमाव्यतिरिक्त खाजगी संस्थांसाठीचे प्रवेश नियम हे शासकीय व शासन अनुदानित संस्थासाठीसुध्दा लागू राहतील, असेही उक्त शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. दिनांक ३१/०५/२०१६ च्या शासन निर्णयानुसार शासन अनुदानित अल्पसंख्यांक संस्थांतील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम प्रवेशासाठी १०० टक्के जागा अल्पसंख्यांक समुदायातील उमेदवारांमधून भरण्यात येतील आणि या जागा संबंधित अल्पसंख्याक समाजाच्या उमेदवारांमधून भरल्या गेल्या नाहीत तर रिक्त जागा या बिगर-अल्पसंख्यांक उमेदवारांमधून भरण्यात येतील अशी तरतूद करण्यात आली आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) निवेदनाच्या अनुषंगाने अल्पसंख्यांक संस्थातील प्रवेशाच्या प्रमाणाबाबत तपासणी करण्यात येत असून शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड (जि.बीड) तालुक्यातील रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत

**(२२) * ७१२१ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड (जि.बीड) तालुक्यातील मन्यारवाडी ते आंबेसावळी, ढेकणमोहा व बऱ्हाणपूर, नागापूर (बु.) ते उंबरी फाटा या दोन रस्त्यांची कामे ठेकेदाराने निकृष्ट दर्जाची व अपूर्ण केली असल्याचे तसेच गायरान जमिनीवरील मुरुम आणि नदीतील दगड गोटे यांचा बेकायदेशीर उत्खनन करुन त्याचाच वापर करून शासनाचा महसूल बुडविला असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याचे काम पूर्ण करण्याचा कालावधी एक वर्षाचा असताना उक्त कामास अडीच वर्षांचा कालावधी लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी डी.बी. कंस्ट्रक्शन यांना कार्यारंभ आदेश प्रदान करताना सदर कामाचा पाहणी अहवाल संबंधित विभागाने पाहिला होता काय, त्याची तपासणी करण्यात आली होती काय, काम पूर्ण करुन घेत असताना संबंधित विभागाचे उप अभियंता, शाखा अभियंता यांनी पाहणी केली होती काय, स्थळ पाहणी अहवाल काय म्हणून दिला होता, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या ठेकेदारावर तसेच सदरहू कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१), (२) व (३) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या पॅ.क्र.RD BEE मध्ये १. रामा-५५ जवळ उमरद (खा) ते नागापूर, बऱ्हाणपूर रोड २. प्रामा-१६ जवळ ढेकणमोहा ते आंबेसावळी-मन्यारवाडी रोड ही दोन कामे मंजूर आहेत. या दोन्ही कामांपैकी १. रामा-५५ जवळ उमरद (खा) ते

नागापूर, बऱ्हाणपूर रोड काम कारपेटसह पूर्ण झालेले असून २. प्ररामा-१६ जवळ ढेकणमोहा ते आंबेसावळी-मन्यारवाडी रोड हे काम MPM पर्यंत करण्यात आलेले आहे. तथापि, वाळू ठेका बंद असल्याने वाळू वेळेवर उपलब्ध न झाल्याने, रस्ता रूंदीकरणासाठी शेतकऱ्यांनी अडवणूक केल्यामुळे, वळण रस्त्यासाठी जागा वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे, कोविड महामारीमुळे मजुर उपलब्ध न झाल्याने, काम करण्यासाठी निधी वेळेवर न मिळाल्यामुळे, अतिवृष्टी झाल्यामुळे डांबरीकरणाचे काम करण्यास विलंब झाल्यामुळे सदर २ कामे करण्यास ठेकेदाराकडून विलंब झाला आहे.

सदर रस्त्यांची कामे मंजूर करताना कामाचा डीपीआर कन्सल्टंटव्दारे कामांचा पूर्ण सर्व्हे करून तयार करण्यात आलेला होता. तसेच संबंधित उप अभियंता व शाखा अभियंताव्दारे कामांची स्थळ पाहणी करून मंजूर अंदाजपत्रकानुसार काम करून घेण्यात आले आहे.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कावराबांध-खेडेपार (ता.सालेकसा, जि.गोंदिया) मार्गावरील पोवारीटोला नाल्यावरील पुलासह रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(२३) * ७३२६ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कावराबांध-खेडेपार (ता.सालेकसा, जि.गोंदिया) मार्गावर कोटजमुरा-नवेगाव दरम्यान पोवारीटोला नजीकच्या नाल्यावरील पुलाच्याजवळ रस्ता खचल्यामुळे या ठिकाणी नेहमी अपघात होत असून या पुलामुळे दोघांचा बळी गेल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोवारीटोला नाल्यावरील पूलाचे काम ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे पुलाची दुरवस्था होऊन अपघात होत असून सदर पुलाच्या देखरेखीकडे बांधकाम विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे दुर्लक्ष होत

असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलासह रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी बांधकाम विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पोवारीटोला नजीकच्या नाल्यावरील पुलासह रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) सदर ठिकाणी अपघात घडल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्नाधीन रस्ता हा इतर जिल्हा मार्ग क्र.७५ असून त्याची लांबी ७.०० कि.मी. आहे. राज्यमार्ग ३३५ पासून सा.क्र.४/७०० वर पोवारीटोला गावाजवळ नाबार्ड अंतर्गत पुलाचे व रस्त्याचे काम करण्यात आले आहे.

सा.क्र.०/०० ते ५/१०० पर्यंत (पुलाचा ॲप्रोच रोड व पुल सोडून) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत डांबरीकरणाचे काम करण्यात आले असून सा.क्र.५/१०० ते ७/०० असा १.९०० कि.मी. रस्ता खराब असून दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

पोवारीटोला नजीकच्या नाल्यावरील पुलासह रस्त्याच्या दुरुस्तीचे काम रस्ते व पुल दुरुस्ती अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तिवरे वासियांच्या पुनर्वसनाबाबत

**(२४) * ६५९१ श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड : तारांकित प्रश्न क्रमांक ८९ ला दिनांक १७ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तिवरे धरण दिनांक २ जुलै, २०१९ रोजी अचानक फुटल्यामुळे त्यात २२ व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या असून तिवरे भेंदवाडी गावातील नदी किनारी असणारी १५ घरे (अ, ब, क, ड मिळून ४५ घरे), १३ गोठे व १ पोल्ट्री वाहून गेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या विशेष चौकशी पथकाने आपला अहवाल शासनास माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये सादर केला असून सदर प्रकरणाची चौकशी करताना विशेष चौकशी पथकाने आवश्यक त्या कागदपत्राची तसेच अन्य बाबींची तपासणी केली नसल्यामुळे सदर अहवालाचे पुनर्विलोकन करण्यासाठी शासनाने पुन्हा त्रिसदस्यीय समिती स्थापन करुन या समितीने आपला अहवाल दोन महिन्यात शासनास सादर करावा असे आदेश दिले असल्याचे दिनांक २३ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत समितीने आपला अहवाल शासनास केव्हा सादर केला आहे,

(४) तसेच, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री व अध्यक्ष, श्रीसिध्दीविनायक मंदीर ट्रस्ट, मुंबई यांनी दिनांक १४ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास तिवरे धरण व तिवरे वासियांचे पुनर्वसनासाठी जाहीर केलेला एकूण रुपये ११ कोटीचा निधी शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, केव्हा,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने तिवरे धरण व तिवरे वासियांच्या पुनर्वसनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अप्पर आयुक्त, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे यांच्या दिनांक १७/०२/२०२१ च्या पत्रान्वये पुनर्विलोकन समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून सदर अहवालाची छाननी प्रक्रिया प्रगतीत आहे.
(४) मौजे तिवरे येथील बाधित आपद्ग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी श्री.सिध्दीविनायक गणपती मंदीर न्यास, मुंबई यांचेकडून रुपये ५ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून त्यास दिनांक ०७/०८/२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. श्री.सिध्दीविनायक गणपती मंदिर न्यास, मुंबई यांचेकडून सदर निधी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे सुपूर्द करण्यात आला आहे.
(५) मौजे तिवरे येथील बाधित आपद्ग्रस्तांना मौजे तिवरे येथेच १५ कंटेनर रुपी तात्पुरती निवासस्थाने आवश्यक सोयी सुविधांसह (विद्युत, पाणी, रस्ता) उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

मौजे तिवरे येथील बाधित घरांचे तसेच त्या परिसरामधील भविष्यात धोका पोहचू शकेल अशा एकूण ५६ घरांचे मौजे अलोरे, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी येथील शासनाच्या नांवे असलेल्या स.नं. १०४ व स.नं. १०५ या जागेमध्ये कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कारंजा (जि.वाशिम) येथील उपजिल्हा रूग्णालयातील साहित्य खरेदीत अनियमितता झाल्याबाबत

**(२५) * ७२९८ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा (जि.वाशिम) येथील उपजिल्हा रूग्णालयातील साहित्य खरेदी अनियमिततेचा पाच सदस्यीय समितीचा चौकशी अहवाल दिड महिना होऊनही सादर करण्यात आला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कारंजा येथील उपजिल्हा रूग्णालयातील साहित्य खरेदी अनियमिततेचा पाच सदस्यीय समितीचा चौकशी अहवाल सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

कारंजा (जि.वाशिम) येथील उपजिल्हा रुग्णालयातील साहित्य खरेदी अनियमिततेबाबतचा पाच सदस्यीय समितीचा अहवाल दिनांक २२/०१/२०२१ रोजी जिल्हाधिकारी, वाशिम यांना सादर करण्यात आला आहे.
(२) प्राथमिक चौकशी अहवालात तत्कालीन वैद्यकीय अधिकारी कारंजा व तेथील कर्मचारी दोषी आढळून आले आहेत. तथापि, अनियमितता व एकूण वसुलपात्र रक्कम व त्यासाठी जबाबदार असलेले अधिकारी/कर्मचारी याबाबत स्पष्टपणे अहवालात नमूद नसल्याने, सदर प्रकरणाचे सखोल लेखा परिक्षण करून जबाबदारी निश्चित करण्याबाबत सहसंचालक (अतां) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी राज्य लेखा व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना दिनांक २५/०२/२०२१ अन्वये पत्र दिले असून, प्रकरणाचे सखोल लेखा परिक्षण करून जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्या नावांसह व आर्थिक अनियमितता व वसुलपात्र रकमेसह लेखा परिक्षणाचा अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोईसर (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालय इमारतीच्या जिन्याखाली टपरीधारकांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(२६) * ६७०१ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या धोकादायक इमारतीच्या जिन्याखाली रुग्णालयाबाहेर व्यवसाय करणाऱ्या टपरीधारकांनी ऊस व इतर वस्तू ठेवून गोडाऊन केले असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रुग्णालयात दररोज उपचार घेण्याकरीता २०० हून अधिक रुग्ण येत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अवैधरित्या वस्तू ठेवून गोडाऊन तयार करणाऱ्या टपरीधारकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात क्षय रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

**(२७) * ७२०७ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुणकाका जगताप, श्री.संजय दौंड, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहे मार्च, २०२० पासून करोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत असताना क्षय रुग्णांच्या शोध मोहिमेत खंड पडल्यामुळे क्षय रुग्णांच्या संख्येत ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने क्षय रुग्णांची शोध मोहिम पुन्हा सुरु करुन वाढत असलेली संख्या कमी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

सन २०१९ (माहे जानेवारी ते डिसेंबर) मध्ये २२७००४ व सन २०२० (माहे जानेवारी ते डिसेंबर) मध्ये १५९२२४ क्षयरोग रुग्णांचे निदान झाले आहे. मार्च, २०२० पासून कोरोना महामारीमुळे लॉकडाऊन घोषित झाले असले तरी माहे जानेवारी ते डिसेंबर, २०२० या कालावधीत १५९२२४ क्षय रुग्णांचे निदान करुन उपचार सुरु करण्यात आले. यावरुन कोरोना कालावधीत क्षयरुग्ण संख्येत वाढ झालेली नाही.
(२) सदर प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

कोरोना काळात लॉकडाऊन काळात संपूर्ण महाराष्ट्रात दिनांक १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीत विशेष क्षयरुग्ण शोध मोहिम राबविण्यात आली त्यामध्ये १२८२३ नवीन रुग्ण तपासणी करुन उपचाराखाली आणण्यात आले. तसेच दिनांक ०८/०२/२०२१ पासून Active Case detection and regular supervision (ACDARS) राबविण्यात येत आहे. सदर मोहिमेंतर्गत क्षयरुग्णांचा शोध घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला येथील शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२८) * ६८७४ श्री.गोपिकिशन बाजोरीया : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ३२२३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामधील मोठ्या प्रमाणात महत्वाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमातील पदे रिक्त असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा ह्या "नीट" परीक्षेच्या गुणवत्तेनुसार भरण्यात येतात. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये एकूण ४३ जागा पैकी २९ जागा भरण्यात आल्या असून १४ जागा रिक्त आहेत. सदर रिक्त जागा ह्या प्रामुख्याने नॉन-क्लिनिकल विषयातील आहेत.

(२) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केल्याचे आढळून येत नाही.

(३) व (४) शासकीय वैद्यकीय, अकोला येथील विविध शिक्षक व शिक्षकेतर संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## पालगड (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे सानेगुरुजींचे स्मारक होण्याबाबत

**(२९) * ७२५५ श्री.रामदास कदम : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक ५३२२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालगड (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे सानेगुरुजींचे स्मारक होण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. : स्मारक-२०१६/प्र.क्र.०३/पंरा-९, दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ मधील तरतुदीनुसार, स्मारक उभारण्यासाठी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या अध्यक्षतेखाली स्मारक समिती गठीत करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून पालगड येथे साने गुरुजी यांचे स्मारक निश्चित करण्यासाठी रुपये ३०.०० लाख इतक्या रक्कमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली असून रुपये १०.०० लक्ष इतका निधी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना वितरित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पालगड येथे सानेगुरुजींचे स्मारक होण्यासाठी उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) समिती गठीत करण्याची मागणी आल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून मौजे पालगड, ता.दापोली, जि.रत्नागिरी येथे परमपुज्य साने गुरुजी यांचे जन्मस्थळ परिसर विकास करण्यासाठी रुपये ३०.०० लक्ष इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देऊन रुपये १०.०० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे. वितरित केलेला निधी खर्च झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर निधी उपलबधतेनुसार उर्वरित निधी रुपये २०.०० लक्ष वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील रुग्णालये व आरोग्य केंद्रातील रिक्त पदे व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(३०) * ६८४९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय, प्राथमिक आरोग्य कैंद्रे, ग्रामीण रूग्णालये, महिला रूग्णालये व उपकेंद्र येथे निकषाप्रमाणे पद भरती केली नसल्याने विद्यमान कर्मचारी व यंत्रणा यांना कामाचा ताण सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकसंख्येच्या प्रमाणात पद निर्मिती व रिक्त पदे भरण्याबाबत तसेच इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, याबाबत तालुकानिहाय थोडक्यात माहिती काय आहे व किती मुदतीत पद भरती व इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) परभणी जिल्ह्यातील आरोग्य संस्थांच्या मंजूर आकृतिबंधनुसार गट अ ते गट ड संवर्गाचे काही पदे रिक्त आहे, हे खरे आहे. तथापि, रिक्त पदांवर राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तसेच कंत्राटी तत्वावर रिक्त पदे नियुक्त्या देण्यात येऊन रुग्णसेवा सुरळीत देण्यात येत आहे.

(२) व (३) मंजूर बृहत आराखड्यानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात आरोग्य संस्थांना मान्यता देण्यात आलेल्या आहेत. तसेच सुधारित लोकसंख्येच्या आधारे नवीन संस्था मंजूरीचा जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच काही मंजूर आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्यात आलेले आहे. आरोग्य संस्थेच्या प्रकारानुसार संबंधित आरोग्य संस्थेचा पदांचा आकृतिबंध निश्चित केलेला आहे. सद्य:स्थितीत परभणी जिल्ह्यात ४०६ खाटांचे जिल्हा रुग्णालय, ६० खाटांचे स्त्री रुग्णालय (श्रेणीवर्धन मान्य करुन १०० खाटांचे), ५० खाटांचे २ उपजिल्हा रुग्णालये, ३० खाटांचे ७ ग्रामीण

रुग्णालये त्यापैकी, मानवत येथील ३० खाटांच्या रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन ५० खाटांचे रुग्णालयास मान्यता दिलेली आहे. तसेच परभणी जिल्ह्यात नऊ तालुक्यांमध्ये ३७ प्राथमिक आरोग्य केंद्र, ४ आयुर्वेदिक दवाखाने, २ युनानी दवाखाने, ४ प्राथमिक आरोग्य पथके व २१५ उपकेंद्र कार्यरत आहेत व सन २०२० मध्ये ०३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ४ उपकेंद्रे मंजूर करण्यात आलेली आहेत. श्रेणीवर्धन मान्य करण्यात आलेल्या रुग्णालयांचे ७५ टक्के बांधकाम पूर्ण झाल्यावर पदनिर्मिती करण्यात येते व उर्वरित आकृतिबंधानुसार मंजूर पदांपैकी नियमित रिक्त पदांवर पद भरतीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील गट क व गट ड ची पदे संबंधित जिल्हा परिषदेकडे भरण्यात येतात व याबाबत ग्रामविकास विभागाकडून पद भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने गट अ चे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी व उर्वरित पदांवर राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्वावर पद भरती करुन पदस्थापना देण्यात आल्या असून रुग्णसेवा देण्यात येत आहे. सार्वजनिक आरोग्य व ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील रिक्त पदांसाठी पद भरती प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात परिचर्या प्रशिक्षण संस्थेमध्ये अध्यापकीय संवर्गातील पदे भरणेबाबत

**(३१) * ७१४४ श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नव्याने सुरू केलेल्या बी.एस्सी. (नर्सिंग) व एम.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमासाठी ५ परिचर्या प्रशिक्षण संस्थेमध्ये आवश्यक अध्यापकीय व अशैक्षणिक पद निर्मितीबाबत दिनांक २१ एप्रिल, २०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित करून, ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम व वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी भारतीय परिचर्या परिषदेच्या मानकानुसार आणि आरोग्य विज्ञान प्राप्त होण्यासाठी आवश्यक असणारी अध्यापकीय ४१ पदे व अशैक्षणिक ३ पदे निर्माण करण्यासाठी शासनाने मंजुरी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पदे भरण्यासाठी शासनाने दिनांक ९ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयानुसार समिती गठीत करण्यास मंजुरी दिली, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, रिक्त पदांपैकी ५० टक्के पदे अनुभवी व सेवाज्येष्ठ प्राध्यापकांमधून व ५० टक्के पदे सरळ सेवेने भरण्यात यावी यासंबंधी ग्रॅज्युएट नर्सेस टिचर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, नागपूर या संघटनेव्दारा व नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदने दिली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून परिचर्या महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) शासन निर्णय दिनांक २१/०४/२०१४ अन्वये गट अ व गट ब या संवर्गामध्ये निर्माण करण्यात आलेली ३३ नवीन पदे तसेच यापूर्वी परिचर्या शिक्षण संस्थेमध्ये कार्यरत असलेली ८ पदे अशी एकूण ४१ पदे भरण्याबाबत दिनांक २०/०३/२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. सदर ४१ पदे नवीन असल्यामुळे त्या पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम करण्यास विलंब होणार असल्याने वरील पदे एक वेळची विशेष बाब म्हणून एक वर्षाकरीता सरळसेवेने भरण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सदर पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. तथापि, श्रीमती संगिता भुजबळ व इतर यांनी जाहिरातीवर घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे मूळ अर्ज क्र.२६४/२०१९ दाखल

केला. सदर मूळ अर्जावर देण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार ७ अधिकाऱ्यांना सहायक प्राध्यापक पदावर दिनांक ५/०१/२०२१ च्या आदेशान्वये पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच सहायक प्राध्यापक संवर्गामधील ९ पदे सरळसेवेने भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना पुरस्कार प्रदान करण्याबाबत

**(३२) * ७४४९ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड** : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना दरवर्षी सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कला, क्रीडा व सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने मराठी साहित्यातील उत्कृष्ट वाङ:मय साहित्य पुरस्कारांनी गौरवण्यात येऊन रोख रक्कमेसह पुरस्कार प्रदान करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या दोन वर्षापासून शासनाने पुरस्कार जाहीर केले नसल्याची बाब दिनांक २१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना पुरस्कार प्रदान करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.

सांस्कृतिक कार्य विभागामार्फत सांस्कृतिक क्षेत्राशी सबंधित उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्ती तसेच संस्थांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात येते. तथापि, मराठी साहित्यातील उत्कृष्ट वाङ्‌मय साहित्य पुरस्कार या विभागामार्फत प्रदान केले जात नाहीत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कौसडी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरुन कर्मचाऱ्यांच्या वसाहतीचे बांधकाम करण्याबाबत

**(३३) * ७१४३ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौसडी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील बसवेश्वर नगर परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत उभारली असून सदर प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यात न आल्याने परिसरातील ५५ ते ६० हजार नागरिकांना आरोग्य सुविधांचा लाभ मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोग्य केंद्रात आरोग्य सहाय्यिका १, आरोग्य सेविका ४, मिश्रक १ (वाघी), परिचर ३, आरोग्य सेवक १ (हिवताप खाते) व आरोग्य पथक १ (वाघी) ही पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांसाठी गायरान जागेत इमारत बांधण्याचे आदेश देण्यात आले असून इमारत न बांधण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर काही लोकांनी अतिक्रमण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कौसडी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत राहणाऱ्या नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करुन

रिक्त पदे भरणे, लोकांनी अतिक्रमण केलेल्या रस्त्यावरचे अतिक्रमण काढणे तसेच, कर्मचाऱ्यांच्या वसाहतीसाठी इमारतीचे बांधकाम करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची किरकोळ कामे प्रलंबित असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने मुख्य इमारत आरोग्य विभागास हस्तांतरीत केलेली नाही. तथापि, प्राथमिक आरोग्य पथकाच्या इमारतीतून येथील नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.
(२) हे खरे आहे.

सदरील रिक्त पदे प्राथमिक आरोग्य केंद्र कौसडी, प्राथमिक आरोग्य पथक वाघी व त्या अंतर्गत येणाऱ्या ९ उपकेंद्रातील मिळून आहेत.
(३) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांसाठी गायरान जागेत निवासस्थान बांधण्यासाठी जागा मिळालेली आहे. कर्मचारी निवासस्थान बांधकामाकरीता पुरेसा निधी उपलब्ध नाही. जिल्हा वार्षिक योजनेतून सन २०२१-२०२२ च्या प्रारुप आराखड्यात कर्मचारी निवासस्थान बांधकामासाठी रुपये ५.०० कोटीची मागणी करण्यात आली आहे.
(४) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात अतिक्रमण झालेले नाही.
(५) जिल्हा परिषदेने ग्रामविकास विभागाकडे रिक्त पदांचा तपशिल कळविला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान बांधकामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२०२२ चे प्रारुप आराखड्यात निवासस्थान बांधकामाकरीता निधीची मागणी करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर आरोग्य केंद्रात सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३४) * ७७८४ श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर आरोग्य केंद्रात शस्त्रक्रिया केलेल्या ४० आदिवासी महिलांना जमिनीवर झोपवले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रूग्णालयात केवळ दहा रुग्णांची क्षमता असताना लक्ष्य पूर्ण करण्यासाठी येथील डॉक्टरांनी इतक्या मोठ्या संख्येने शस्त्रक्रिया केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आरोग्य केंद्रात खाटा, पाण्याची सोय, पुरेशा चादरी आदि कोणत्याही मूलभूत सुविधा नसल्याने या शस्त्रक्रिया केलेल्या महिलांना थंडीत त्रास सहन करावा लागल्याने स्थानिकांनी संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित डॉक्टरांवर कोणती कारवाई केली तसेच सदर आरोग्य केंद्रात सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक २०/०१/२०२१ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र शिरसगांव, ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक येथे ४१ महिलांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आल्या व या सर्व लाभार्थ्यांना झोपण्यासाठी गादयांची व्यवस्था करण्यात आलेली होती.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) नाही, हे खरे नाही.

दिनांक २०/०१/२०२१ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र शिरसगांव, ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक येथे ४१ महिलांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आल्या व या सर्व लाभार्थ्यांना पाण्याची सोय, गादया, बेडशिटस, चादरी याबाबींची व्यवस्था करण्यात आली होती व कोणत्याही लाभार्थ्यांना त्रास झाल्याबाबत तक्रार आलेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे धामापूर, खालचा वाडा ते आंबेरी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत

**(३५) * ७८३५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धामापूर, खालचा वाडा ते आंबेरी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या ६.५ कि.मी. लांबीच्या ग्रामीण मार्ग क्र. ४०२ रस्त्याच्या मजबूतीकरणासह डांबरीकरणासाठी शासनाने माहे डिसेंबर, २०१९ अखेर रुपये ४३०.३५ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देवून सा.क्र ०/०० ते १/५०० मधील रस्ता दुरुस्तीचे काम विविध योजनांतर्गत प्राधान्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग (सार्वजनिक बांधकाम) यांना सूचना देवूनही काम हाती न घेतल्याने अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे धामापूर, खालचा वाडा ते आंबेरी या संपूर्ण रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे तसेच सदरचे काम पूर्ण करुन केव्हापर्यंत या मार्गाने ग्रामस्थांना एस.टी. वाहतूक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मौजे धामापूर, खालचा वाडा ते आंबेरी रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१), (२) व (३) चौके बावखोल आंबेरी धामापूर रस्ता ता.मालवण या रस्त्याची एकूण लांबी ८.३०० कि.मी. असून त्यापैकी ६.५० कि.मी. लांबीची सुधारणा व डांबरीकरण करण्याचे काम सन २०१६-२०१७ बॅच १ मुख्यमंत्री ग्राम सडक योजनामधून मंजूर झाले असून रुपये ४३०.३५ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

यामध्ये १) धामापूर हरिजनवाडी ते आंबेरी मार्ग ग्रामीण मार्ग क्र.४०२ व २) चौके व्हाया बावखोल आंबेरी मार्ग ग्रामीण मार्ग क्र. ४०८ या दोन रस्त्यांचा समावेश झालेला आहे. यामध्ये ग्रामीण मार्ग क्र. ४०८ ची प्रत्यक्षात असलेली ५.३०० कि.मी. लांबी व ग्रामीण मार्ग क्र. ४०२ वरील सा.क्र.१/८०० ते ३/०० अशी १.२०० कि.मी. लांबीचा समावेश आहे.

प्रश्नांकित ग्रामीण मार्ग क्र. ४०२ मधील सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्ता दुरुस्तीचे काम कोणत्याही योजनेमधून मंजूर करण्यात आलेले नाही.

चौके बावखोल आंबेरी हरिजनवाडी धामापूर खालचीवाडी रस्ता प्रवासी वाहतुकीस योग्य असून सदर रस्त्यावरुन एस.टी.बस सेवा सुरु करण्याबाबतचे पत्र जिल्हा परिषदेमार्फत आगार व्यवस्थापक, मालवण व कुडाळ यांना देण्यात आले आहे.

सा.क्र. ०/००ते १/५०० या लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२०२१ मध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय ग्रामीण आरोग्याच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित शासन सेवेत समायोजित करण्याबाबत

**(३६) * ७८४९ श्री.संजय दौंड, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना कालावधीमध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्याच्या कंत्राटी कामगारांनी योगदान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांची “विशेष बाब” म्हणून सेवा प्रवेश नियमात तात्पुरता बदल करुन या कर्मचाऱ्यांना नियमित शासन सेवेत समायोजित करण्यात यावे अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीनुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) नाही, मागणीची पडताळणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सिंचन प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याबाबत

**(३७) * ७९११ श्री.दुष्यंत चतुर्वेदी, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक ४८०९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विदर्भात १२३, मराठवाड्यात ५५ व उर्वरित महाराष्ट्रात १३५ अशा एकूण ३१३ सिंचन प्रकल्पांची कामे मागील अनेक वर्षापासून सुरु असून निधीची उपलब्धता न झाल्यामुळे सदर सिंचन प्रकल्प प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये एक लाख नऊ हजार कोटी एवढया निधीची आवश्यकता असून आतापर्यंत उक्त प्रकल्पांवर किती खर्च झाला आहे,

(३) तसेच, विदर्भात सिंचन अनुशेष असूनही अमरावती विभागात १ लाख ७९ हजार ४७७ हेक्टर क्षेत्र सिंचन ओलिताखाली आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर सिंचन प्रकल्पांवर झालेला कोटयवधी रुपयांचा खर्च वाया जावू नये व खर्चात आणखी वाढ होऊ नये, तसेच राज्यातील सिंचनाचा प्रश्न सुटावा यासाठी प्रलंबित असलेले ३१३ प्रकल्प पूर्ण करण्याकरीता प्राधान्यक्रम आणि कालमर्यादा निश्चित करण्याची आवश्यकता असल्यामुळे याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने विदर्भासह अमरावती विभागातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्याच्यादृष्टीने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे तसेच, प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) सन २०२०-२०२१ च्या वार्षिक आखणीनुसार २७८ सिंचन प्रकल्प बांधकामाधीन असून त्यापैकी विदर्भातील १०८ मराठवाड्यातील ४३ व उर्वरित महाराष्ट्रातील १२७ प्रकल्प बांधकामाधीन आहेत.
(२) सन २०२०-२०२१ च्या वार्षिक आखणीनुसार सदर २७८ बांधकामाधीन सिंचन प्रकल्पांवर माहे मार्च, २०२० अखेर सुमारे रुपये ९७,३१० कोटी इतका खर्च झाला आहे. सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी या व्यतिरिक्त सुमारे ९९,९३४ कोटी रुपयांची आवश्यकता आहे.
(३) सद्य:स्थितीत जून, २०२० अखेर अमरावती विभागात १,६०,७६६ हेक्टर रब्बी समतुल्य सिंचनाचा अनुशेष शिल्लक आहे.
(४) वार्षिक आखणीमध्ये प्रकल्पांसाठी निधी प्रस्तावित करताना पुढील १ वर्षात पूर्ण होणारे प्रकल्प, पुढील २ वर्षात पूर्ण होणारे प्रकल्प, पाणीसाठा पूर्ण झालेल्या प्रकल्पांची वितरण व्यवस्था पूर्ण करून सिंचन क्षमता निर्मिती प्रस्तावित असलेले प्रकल्प, घळभरणी प्रस्तावित असलेले प्रकल्प व अन्य प्रकल्प असा प्राधान्यक्रम निश्चित केला जातो.

(५) अमरावती प्रदेशातील चार जिल्ह्यातील (अमरावती, अकोला, वाशिम व बुलढाणा) जून, २०२० अखेर शिल्लक अनुशेष १६०७६६ हे. रबी समतुल्य क्षेत्र इतका आहे. या अनुशेष असलेल्या जिल्ह्यातील प्रकल्पांसाठी सन २०२०-२०२१ मध्ये एकूण रुपये १९४३.६२ कोटी तरतूद करण्यात आली आहे.

अमरावती प्रदेशातील अनुशेष दुर करणेस्तव सुक्ष्म नियोजन तयार करण्यात आलेले असून, उर्वरीत अनुशेष टप्याटप्याने जून, २०२४ पर्यंत दूर करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैद्यकीय आस्थापना कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३८) * ८०४३ श्री.निलय नाईक, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वैद्यकीय आस्थापना कायद्याची अंमलबजावणी मागील दहा वर्षापासून करण्यात आली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय सेवांच्या प्रमाणीकरणासाठी त्याव्दारे या क्षेत्रातील अपप्रवृत्तींना प्रतिबंध करण्यासाठी परिणामकारक ठरणाऱ्या वैद्यकीय आस्थापना कायद्याची अंमलबजावणी इतर राज्यात झाली असून महाराष्ट्र राज्यात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात ९० टक्क्याहून अधिक डॉक्टर खाजगी व्यवसाय करतात पण खाजगी आरोग्य सेवेचे प्रमाणीकरण झाले नसल्यामुळे रुग्णांना दर्जेदार सेवा सुयोग्य दरात मिळत नसून कोरोना काळात रुग्णांची फसवणूक झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने वैद्यकीय आस्थापना कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

खाजगी वैद्यकीय व्यवसायकांमार्फत कोरोनाकाळात रुग्णांची आर्थिक फसवणूक होऊ नये यासाठी दिनांक ३०/०४/२०२०, दिनांक २१/०५/२०२०, दिनांक ३१/०८/२०२०, दिनांक ३०/११/२०२० व दिनांक १५/१२/२०२० रोजी अधिसूचना जारी करुन वैद्यकिय सेवेचे दर नियंत्रण करण्यात आले आहे.
(४) रुग्णहिताच्या दृष्टीने महाराष्ट्रात शुश्रुषागृह नोंदणी नियम, १९७३ मध्ये आवश्यक सुधारणा करुन दिनांक १४/०१/२०२१ रोजी सुधारित नियम २०२० अधिसूचित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी गावपाड्यांमध्ये रस्ते व विजेची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) * ७५५१ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळशेत-खरोंडा (ता.जव्हार, जि.पालघर) ग्रामपंचायत अंतर्गत हुंबरण, सुकळीचापाडा, तिलोंडा ग्रामपंचायतमधील डोंगरीपाडा, कोगदा ग्रामपंचायतमधील उदारमाळ, हातेरीतील केळीचापाडा, विनवळमधील निंबारपाडा, तुंबडपाडा, झापमधील दखण्याचापाडा, ऊंबरपाडा, पाथर्डीतील मनमोहाडी, भाट्टीपाडा, न्याहाळेतील सावरपाडा, ऐनातील सोनगीरपाडा, घाटाळपाडा, भूरीटेक ग्रामपंचायत आणि वावर-वांगणीतील बेहेडपाडा या

आदिवासी गावपाड्यात रस्ते नसल्यामुळे रुग्णांना डोलीतून दवाखान्यात न्यावे लागत असून अनेक रुग्णांचा रस्त्यातच मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या असल्याचे तसेच विजेची सुविधा नसल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी गावपाड्यांना स्थानिक लोकसभा सदस्य, पालघर, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री तसेच स्थानिक जिल्हा परिषद सदस्य यांनी वेळोवेळी भेटी देऊन शासनाशी पत्रव्यवहार केला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावपाड्यातील आदिवासी नागरिकांनी अनेकदा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जव्हार, मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर/ठाणे (तत्कालीन संयुक्त जिल्हा) जिल्हाधिकारी, पालघर/ठाणे तसेच मा.तत्कालीन पालकमंत्री, पालघर, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम, जव्हार, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, पालघर तसेच कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, पालघर यांना निवेदने देऊनही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासींच्या कल्याणासाठी शासन करोडो रुपये खर्च करीत असताना सदर गावपाड्यात रस्त्यांची कामे करण्याबाबत व वीज उपलब्ध होण्याबाबत तेथील नागरिकांनी विनंती अर्ज/निवेदने देऊनही रस्त्यांची कामे न करण्याची व वीज सुविधा उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर गावपाड्यातील रस्त्यांची कामे करण्याबाबत व विजेची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) प्रश्नांकित आदिवासी गावपाड्यातील काही पाड्यांना बारमाही रस्ते उपलब्ध नसल्यामुळे एका गरोदर महिलेस दवाखान्यात नेण्यासाठी वाहनाची व्यवस्था विहित वेळेत होऊ शकली नाही. त्यामुळे प्रसुतीदरम्यान नवजात बालकाचा दुर्दैवाने मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच सदर पाड्यांपैकी काही पाड्यांमध्ये पारंपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्यात आले आहे तर काही पाड्यांचे विद्युतीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) व (३) अशी कोणतीही बाब निदर्शनास आली नाही.

(४) १) ग्रामपंचायत पिंपळशेत-खरोंडा अंतर्गत हुंबरण येथे सन २०१६-२०१७ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत माती मुरमीकरण करण्यात आले आहे.

२) ग्रामपंचायत पिंपळशेत-खरोडा अंतर्गत सुकळीचामाळ येथे कच्चा रस्ता आहे.

३) ग्रामपंचायत तिलोंडा अंतर्गत डोंगरीपाडा येथे कच्चा रस्ता असून वन खात्याची जागा आहे.

४) ग्रामपंचायत कोगदा अंतर्गत उदारमाल हा पाडा कोगदा-वडोली ग्रामीण रस्त्यापासून ३०० मी. अंतरावर असून रस्ता सुस्थितीत आहे.

५) ग्रामपंचायत हातेरी अंतर्गत केळीचापाडा येथे कच्चा रस्ता असून जागा वन खात्याची आहे.

६) विनवळ अंतर्गत निंबारपाडा व तुंबडपाडा येथे रस्ता आहे.

७) ग्रामपंचायत झाप अंतर्गत दखण्याचा पाडा येथे सन २०१५-२०१६ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत खडीकरण करण्यात आले आहे.

८) ग्रामपंचायत झाप अंतर्गत उंबरपाडा येथे रस्ता असून सदर रस्ता दखण्याचा पाडा पक्का रस्त्यास जोडलेला आहे.

९) ग्रामपंचायत ऐने अंतर्गत मनमोहाडी येथे रस्ता नाही व पुलाची आवश्यकता आहे.

१०) ग्रामपंचायत ऐने सोनगीरपाडा येथे रस्ता नाही.

११) ग्रामपंचायत ऐने अंतर्गत घाटाळपाडा येथे रस्ता असून पुलाची आवश्यकता आहे.

१२) ग्रामपंचायत पाथर्डी अंतर्गत भाटीपाडा येथे रस्ता नाही.

१३) ग्रामपंचायत न्याहाळे बु. अंतर्गत सावरपाडा येथे कच्चा रस्ता असून पुलाची आवश्यकता आहे.

१४) ग्रामपंचायत भुरीटेक इतर जिल्हा मार्ग क्र.४३ ला जोडण्यात आला आहे.

१५) ग्रामपंचायत वावर-वांगणी अंतर्गत बेहेडेपाडा हा पाडा सरोळी बेहडपाडा या ग्रामीण मार्गावर असून सन २०१६-२०१७ अंतर्गत डांबरीकरणाचे काम करण्यात आले असून रस्ता सुस्थितीत आहे.

(५) सदर पाडे भौगोलिकदृष्टया अतिदुर्गम, डोंगराळ, दरी खोऱ्याच्या भागात असल्याने आणि सदर पाड्यांना जोडणारी पायवाट वन विभागाच्या हद्दीतून जात असल्याने सदर पाडे बारमाही रस्त्याने जोडणे जिल्हा परिषदेला शक्य झालेले नाही.

तथापि, सदर पाडे बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेला देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सालोड-पालोती (जि.वर्धा) येथील नाली बांधकामाकरीता अवैधरित्या वाळूचा वापर केला जात असल्याबाबत

**(४०) * ६९४६ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालोड-पालोती (जि.वर्धा) येथील रस्त्याच्या कडेला जिल्हा परिषद बांधकाम विभागांतर्गत नाली बांधकामाकरीता अवैधरित्या वाळूचा वापर केला जात असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अशी कोणतीही बाब निदर्शनास आली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीयांसाठीच्या शिष्यवृत्तीच्या यादीत "बीएस्सी पीएमटी" अभ्यासक्रमाचा समावेश करण्याबाबत

**(४१) * ७८२५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात बॅचलर ऑफ पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी (बीएस्सी पीएमटी) अभ्यासक्रमाची शिष्यवृत्ती सन २०१६ पासून बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाने मागासवर्गीयांसाठीच्या शिष्यवृत्तीच्या यादीत "बीएससी पीएमटी" अभ्यासक्रमाचा समावेश केला नसल्याने शिष्यवृत्ती बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने सन २०१६ मध्ये काढलेल्या अध्यादेशात मागासवर्गीयांसाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीच्या ६०५ अभ्यासक्रमांच्या यादीत या अभ्यासक्रमाचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) नाही.

बॅचलर ऑफ पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी (बीएस्सी पीएमटी) अभ्यासक्रमास प्रवेशित आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांना शिष्यवृत्ती अदा करण्यात येत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांना राज्य शासनाचे शिष्यवृत्ती धोरण लागू नाही.

(३) शिष्यवृत्ती देय असलेल्या अभ्यासक्रमांच्या यादीमध्ये ‘बीएस्सी पीएमटी’ अभ्यासक्रमाचा समावेश करण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद (घाटी) येथील इमारतीत जुनी वायरिंग व इतर साहित्य बदलण्याबाबत

**(४२) * ६६२६ श्री.अंबादास दानवे** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (घाटी) सर्जिकल इमारतीत ४० वर्षापूर्वीची जुनी वायरिंग व मुदत संपलेले अग्निशमन सिलेंडर असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घाटीत दीड वर्षापुर्वी प्रसुती विभागात शॉटसर्किटमुळे दुर्घटना घडली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीत भंडारासारख्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून शासनाने जुनी वायरिंग व इतर साहित्य बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख** : (१) हे खरे आहे.

तथापि, सदर संस्थेच्या सर्जिकल इमारतीतील मुदत संपलेल्या अग्निशमन यंत्राची तातडीने पुनर्भरणी करण्यात आलेली असून सर्जिकल इमारतीतील सर्व अग्निशमन यंत्रे योग्यरित्या कार्यान्वित आहेत.

(२) होय.

(३) याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## नागपूर मेडिकलमध्ये कॅन्सर इन्स्टिट्यूटचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(४३) * ६४९४ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.अभिजित वंजारी : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ४७०६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मेडिकलच्या प्रस्तावित कॅन्सर इन्स्टिट्यूटची जमीन अधिष्ठाताच्या नावावर नसल्यामुळे कॅन्सर इन्स्टिट्यूटचे काम प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामाच्या आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्यानंतर नागपूर महानगर प्रदेश विकास (NMRDA) प्राधिकरणाकडून निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर कॅन्सर इन्स्टिट्यूट उभारण्यासाठी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी आश्वासन दिले असून प्रत्यक्षात कॅन्सर इन्स्टिटयूट उभारण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सदर बांधकामाशी संबंधित लेखाशिर्षात सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.
(२) सदर कॅन्सर इन्स्टिट्यूटची जमीन संस्थेच्या नावे झालेली नसल्यामुळे बांधकाम करणे आवश्यक परवानगी प्रलंबित आहे, सबब नागपूर महानगर प्रदेश विकास (NMRDA) प्राधिकरणाकडून निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु करण्यात आलेली नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.

सदर कर्करोग इन्स्टिट्यूट उभारण्यास प्रशासकीय मान्यता तसेच बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, याबाबत सदर संस्थेचे बांधकाम सुरू करण्याबाबतची सद्य:स्थिती उपरोक्त प्रश्नभाग क्रमांक २ च्या उत्तरात नमूद करण्यात आलेली आहे.
(४) सदर बांधकामासाठी संबंधित लेखाशिर्षात सन २०२०-२०२१ मध्ये आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. सदर संस्थेच्या बांधकामासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यात आणणाऱ्या योजनेला चालना देण्याबाबत

**(४४) * ६३४५ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिमवाहिनी नदी खोऱ्यातील (कोकण) अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणेसाठी प्राथमिक अभ्यास करणेकरीता कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून गोदावरी खोऱ्यात कोकणातील नार-पार, दमणगंगा, वैतरणा, उल्हास नदी खोऱ्यातून एकूण ८९.८५ अघफू पाणी वळविणेबाबत आखणी करून त्याबाबत शिफारस केलेल्यापैकी २.४३ अघफू पाणी वळणाच्या पूर्ण/बांधकामाधीन योजनेची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १५.५५ अघफू पाणी वळणाबाबत पार-गोदावरी नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व दमणगंगा-एकदरे-गोदावरी या दोन नदीजोड प्रकल्पांचे राष्ट्रीय जल विकास प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेमार्फत तयार करण्यात येणाऱ्या सविस्तर प्रकल्प अहवालाची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उर्ध्व वैतरणा धरणातून गोदावरी खोऱ्यात १० अघफू पाणी सोडण्यात येणार असून उर्वरीत ६१.८८ पाणी वळणाबाबतच्या योजनांचे सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेबाबत कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणार आहे, तसेच, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय सल्लागार समितीमार्फत करण्यात येणारी तपासणी पूर्ण झाली आहे काय, याची थोडक्यात माहिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोकणातून समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यात आणणाऱ्या महत्वाकांक्षी प्रकल्पाला चालना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

पश्चिमवाहिनी नदी खोऱ्यातील (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविणेसाठी एकात्मिक राज्य जल आराखड्यात अंतर्भूत असलेल्या योजनांचा प्राथमिक अभ्यास करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १७/०९/२०१९ अन्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे. सदर समितीने त्यांचा अहवाल दिनांक ३१/१०/२०१९ रोजी शासनास सादर केला आहे. सदर अहवालानुसार पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी पूर्वेकडे गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी एकूण ३० प्रवाही वळण योजना प्रस्तावित आहेत. या ३० योजनाव्दारे २०९.८१ द.ल.घ.मी. (७.४०८ अघफू) पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे नियोजन आहे. त्यापैकी २.४३ अघफू पाणी वळणाच्या पूर्ण/बांधकामाधीन योजना आहेत. सदरपैकी १२ वळण योजनांची कामे पूर्ण

झाली असून त्याव्दारे १२.६६ द.ल.घ.मी. (०.४४७ अघफू) पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यात येत आहे. ७ योजनांची कामे विविध टप्प्यांवर प्रगतीपथावर असून या योजनांव्दारे ५६.०३ द.ल.घ.मी. (१.९७८ अघफू) पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे प्रस्तावित आहे. उर्वरित ११ प्रवाही वळण योजना भविष्यकालीन असून या योजनांव्दारे १४१.०९ द.ल.घ.मी. (४.९८२ अघफू) पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे प्रस्तावित आहे.

सुधारित शासन निर्णय दिनांक २९/०६/२०२० अन्वये उपरोक्त समितीची पुनर्रचना करण्यात आली असून कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली गठित सदर समितीमार्फत पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) दमणगंगा-वैतरणा-गोदावरी या नदीजोड योजनेंतर्गत ५ धरणे बांधण्याचे प्रस्तावित असून सदर धरणे एकमेकांशी बोगद्याव्दारे/कालव्याव्दारे जोडण्यात येणार असून ७.१३ अघफू पाणी उपसा पध्दतीने उचलून गोदावरी खोऱ्यातील देव नदीत वळविण्याचे प्रस्तावित आहे. तसेच दमणगंगा-एकदरे-गोदावरी योजनेंतर्गत एकदरे येथे धरण बांधून उपसा पध्दतीने ५.०४ अघफू पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त दोन्ही नदीजोड योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जल विकास प्राधिकरण, नवी दिल्ली या केंद्र शासन अंगीकृत अभिकरणाव्दारे तयार करण्यात येत आहेत. सदरील सविस्तर प्रकल्प अहवाल जून, २०२१ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) उर्वरित ६१.८८ अघफू पाणी वळणाबाबतच्या योजनांचे सर्वेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या रुपये ५२.५० कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीत आहे.

नार पार गिरणा नदीजोड सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन दिनांक २४/१०/२०१९ रोजी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती यांना तपासणीसाठी कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांनी सादर केला आहे. रा.तां.सं.स., नाशिक यांचे सूचनेनुसार प्रकल्प अहवाल दिनांक ४/०२/२०२० रोजी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना तांत्रिक छाननीसाठी सादर केलेला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) सुधारित शासन निर्णय दिनांक २९/०६/२०२० अन्वये पश्चिमवाहिनी नदीखोऱ्यातील (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविण्यासाठी एकात्मिक राज्य जल आराखड्यात अंतर्भूत असलेल्या योजनांचा प्राथमिक अभ्यास करण्यासाठी दिनांक १७/०९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये गठीत समितीची पुनर्रचना करण्यात आली असून कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली सदर समितीची पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

शासन निर्णय दिनांक २९/१०/२०२० अन्वये राज्यांतर्गत नदीजोड/प्रवाही वळण योजनांचा प्राधान्यक्रम ठरविणे व त्यासाठी प्रवाही वळण योजनांचे तसेच उपसा वळण योजनांचे मापदंड तयार करणे, मराठवाडा प्रदेशात किंवा इतर तुटीच्या प्रदेशात/खोऱ्यात पाणी वळविण्याकरीता अहवाल तयार करणे याकरीता महासंचालक, मेरी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळा सुरू करण्यापूर्वी शाळेत स्वच्छतेसाठी नळाच्या पाण्याची व्यवस्था करण्याबाबत

**(४५) * ६८२० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळा सुरू करण्यापूर्वी शाळेत स्वच्छतेसाठी नळाच्या पाण्याची व्यवस्था करणे बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेच्या १ हजार ३२८ शाळांपैकी ६४४ शाळांमध्ये नळजोडणी नसल्याची बाब निदर्शनास आली असून यामध्ये शहापूर तालुक्यातील सर्वाधिक २५६ शाळांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू शाळांमध्ये नळजोडणी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.जेजेएम२०२०/प्र.क्र.११३(भाग-३)पापु-०७, दिनांक १३/०१/२०२१ अन्वये जल जीवन मिशन अंतर्गत १०० दिवसांचे विशेष अभियान मोहिमेची कार्यपध्दती निश्चित केली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या १३२८ शाळांपैकी २३८ शाळांमध्ये कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. तथापि, सदरहू शाळांमध्ये भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत सर्वेक्षण करुन जल जीवन मिशन अंतर्गत शाश्वत पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेच्या विकास कामांचा प्रलंबित निधी देण्याबाबत

**(४६) * ६७८२ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामविकास विभागाच्या २५/१५ हेड अंतर्गत लोकप्रतिनिधींनी सूचविलेल्या नागपूर जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेल्या कामांना निधी मिळाला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये निदर्शनास आली असून त्यामुळे नविन कामांना सुरुवात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नागपूर जिल्हा परिषदेच्या विकास कामांचा प्रलंबित निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ** : (१) हे खरे नाही. पूर्ण झालेल्या कामांना टप्प्या टप्प्याने निधी वितरित करण्यात येत आहे.
(२) विकास कामांच्या प्रलंबित देयकांचा निधी वितरित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खुंटेफळ (ता.आष्टी, जि.बीड) येथील साठवण तलावाचे काम पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४७) * ६९४८ श्री.सुरेश धस** : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुंटेफळ (ता.आष्टी, जि.बीड) येथील साठवण तलावाचे काम अनेक वर्षापासून निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने साठवण तलावाचे काम पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील** : (१) हे खरे नाही.

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत आष्टी उपसा सिंचन योजना क्र.३ योजनेचे काम पर्यावरण मान्यतेअभावी जानेवारी, २०१४ पासून बंद होते. सद्य:स्थितीत राज्य पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण यांनी दिनांक ०२/०३/२०२० च्या पत्रान्वये पर्यावरण मान्यता दिली आहे.

(२) सद्य:स्थितीत निविदेवर जानेवारी, २०२१ अखेर रुपये ११६.११ कोटी खर्च झाला असून, तलावाचे ४५% काम पूर्ण झाले आहे. सन २०२०-२०२१ करीता रुपये १० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंगळवेढे (जि.सोलापूर) पंचायत समिती कार्यालयात पैशांची मागणी होत असल्याबाबत

**(४८) * ७२४९ श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढे (जि.सोलापूर) पंचायत समिती कार्यालयामधील प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेचे कामकाज पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून अनुदानास पात्र असलेल्या लाभार्थ्यांकडून अनुदान अदा होण्यासाठी पैशांची मागणी करण्यात येत असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेतील घरकुलधारक मागासवर्गीय व दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पैशांची मागणी करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महिला धोरणातील त्रुटी दूर करून सर्वंकष धोरण तयार करण्याबाबत

**(४९) * ७४०१ श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सध्याच्या महिला धोरणातील त्रुटी दूर करून सर्वंकष धोरण तयार करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची बाब दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरीब वस्त्यांमधील महिलांचे जीवन सुसह्य करण्याच्यादृष्टीने सुविधा पुरविणे, झोपडपट्टी पुनर्वसनाच्या योजनांमध्ये तेथे राहणाऱ्या विधवा, एकट्या राहणाऱ्या महिला यांना घरे मिळावीत याकडे विशेष लक्ष देणे, नागरी विकास योजनांतर्गत प्रकल्पांच्या आखणीमध्ये महिला केंद्रित दृष्टिकोन ठेवणे व नागरी क्षेत्रात गरीब महिलांना आरोग्याच्या सुविधा प्रभावीपणे पुरविणे तसेच रेशनचे धान्य सुलभ मिळावे इत्यादी बाबींचा त्यात समावेश करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने विविध शासकीय विभागांच्या समाजाभिमुख योजना या महिला केंद्रित असाव्यात याकरीता धोरण ठरविताना कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र शासनाने सन २०१४ मध्ये जाहीर केलेले तिसरे महिला धोरणांमध्ये महिलांची सनद, महिला केंद्री अर्थसंकल्प, आरोग्य, एकल महिला, स्वच्छतागृह सुविधा, असंघटीत कामगार महिला, शहरी भागातील महिलांचे विविध प्रश्न इ. योजनांचा महिला धोरणात समावेश करण्याच्या अनुषंगाने सर्व सबंधित विभागांचे अभिप्राय मागविण्यात आले आहे.

(३) सदरच्या धोरणातील मुद्यांवर राज्याच्या संबंधित प्रशासनीक विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत तसेच त्यात काळानुरुप बदल करणेबाबत संबंधित प्रशासनीक विभागांशी चर्चा करण्यात येत आहे.
(४) विलंब नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील रुग्णालयांचे फायर, स्ट्रक्चरल व इलेक्ट्रिकल ऑडिट करण्याबाबत

**(५०) * ७९८८ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयात जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयांतर्गत एकूण बारा रुग्णालय कार्यरत असून या रुग्णालयाचे फायर, स्ट्रक्चरल व इलेक्ट्रिकल ऑडिट झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक रुग्णालयांच्या भिंती जीर्ण झाल्या असून काही रुग्णालयांमध्ये अग्निरोधक यंत्रणा कार्यान्वित नसून या सर्व रुग्णालयामधील वायरिंग बदलण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालयामध्ये वीज पुरवठा कमी-जास्त प्रमाणात होत असल्यामुळे तेथील उपकरणांमध्ये स्फोट घडून दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पालघर जिल्हयातील रुग्णालयांचे फायर, स्ट्रक्चरल व इलेक्ट्रिकल ऑडिट करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने पालघर जिल्हयातील रुग्णालयांचे फायर, स्ट्रक्चरल व इलेक्ट्रिकल ऑडिट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्हा रुग्णालयाचे अधिपत्याखालील बारा रुग्णालयांचे फायर ऑडिट दिनांक ११ जानेवारी ते दिनांक १३ जानेवारी, २०२१ या कालावधीत करण्यात आले आहे. स्ट्रक्चरल व इलेक्ट्रिकल ऑडिट करुन तातडीने अहवाल सादर करण्याबाबत सर्व आरोग्य संस्थांना कळविण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

सर्व रुग्णालयांमध्ये अग्निरोधक सिलेंडर्स उपलब्ध आहेत. वायरींगबाबत संबंधित विभागाकडून तातडीने तपासणे करुन अंदाजपत्रके सादर करण्याबाबत सर्व आरोग्य संस्थांना कळविण्यात आलेले आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) पालघर जिल्ह्यातील रुग्णालयांचे फायर, स्ट्रक्चरल व इलेक्ट्रिकल ऑडिट संबंधित विभागाकडून तातडीने तपासणी करुन अंदाजपत्रके सादर करण्याबाबत आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## सोनावल ते पाळये (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५१) * ७६०९ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनावल ते पाळये (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याच्या कोटयवधी रूपयाच्या कामास मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूरी मिळाली असून मागील दोन वर्षापासून काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग यांच्यावतीने अनेक कामे परब नावाच्या ठेकेदाराला दिली असून या ठेकेदाराने दोडामार्ग तालुक्यातील एकही काम पूर्ण न करता सर्व कामे अर्धवट स्थितीत ठेवून कामाचा दर्जा योग्य न राखणे, असा प्रकार सुरू केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सर्व संबंधित दोषींविरुध्द कारवाई करुन रस्त्याची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.
सद्य:स्थितीत मातीकाम, मोऱ्या, जीएसबी व खडीकरणाचे काम प्रगतीत आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत दोडामार्ग तालुक्यातील ६ कामे श्री.पी.के.परब या कंत्राटदारास देण्यात आलेली असून सदर कामांपैकी ३ कामे प्रगतीत आहेत तर उर्वरित ३ कामे न्यायालयीन प्रकरण, रस्ता रूंदीकरणास जमीन मालकांचा विरोध, नुकसान भरपाई मिळणेसाठी स्थानिक ग्रामस्थांनी वेळोवेळी काम बंद पाडणे व माहे मार्च, २०२० पासून कोविड-१९ मुळे उद्‌भवलेली परिस्थिती या बाबींमुळे सदरची कामे करण्यास विलंब झालेला आहे.

-----------------

## राज्यात नव्या कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्याबाबत

**(५२) * ६५६४ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ब्रिटनमध्ये नव्या स्वरुपातील कोरोना विषाणूचा प्रकार आढळला असून मूळ स्वरुपात १७ वेळा बदल केलेला हा नवा कोरोना विषाणू ७० टक्के अधिक सक्रिय संक्रमणशील असल्यामुळे त्याची लागण राज्यातील जनतेला होण्याचा धोका निर्माण झाला असल्याची बाब दिनांक २१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्रिटनमधून भारतात आलेल्या प्रवाशांमार्फत कोरोनाच्या नव्या स्ट्रेनचे विषाणू राज्यात पसरत असून दिनांक १० जानेवारी, २०२१ रोजीपर्यंत हा आकडा १५० पर्यंत वाढला असून सदर रुग्ण नागपूर, मुंबई, ठाणे, पुणे, नांदेड, अहमदनगर, औरंगाबाद व रायगड परिसरातील असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ब्रिटनमधून येणारी विमाने थांबविण्यात येऊन विमानातून आलेल्या प्रवाशांना हॉटेलमध्ये विलगीकरणात ठेवणे, नव्या विषाणूची लागण झालेल्या प्रवाशांना आयसीएमआर यांच्या निर्देशानुसार संस्थात्मक विलगीकरणात ठेवणे तसेच, त्यांचा ज्यांच्याशी संपर्क आला त्यांची तपासणी करण्यात येऊन त्यात कोरोनाच्या नवीन स्ट्रेनची रुग्ण संख्या वाढते आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ब्रिटन, युरोप, मध्य पूर्व व दक्षिण आफ्रिका या देशातून येणारे प्रवासी विलगीकरण टाळण्यासाठी मुंबई विमानतळावर उतरण्याऐवजी अहमदाबाद, दिल्ली व बंगळुरू अशा ठिकाणच्या विमानतळावर उतरत असून त्यातील आठ प्रवासी रुग्णांमध्ये ब्रिटनचा कोरोना स्ट्रेन आढळून आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नव्या कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव होऊ नये म्हणून पळवाटा शोधणाऱ्या परदेशी प्रवाशांना रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

डिसेंबर महिन्यात इंग्लंडमध्ये जनुकिय बदल झालेला नवीन कोरोना विषाणू आढळून आला. तो अधिक संक्रमणशील असल्याचे तज्ञांनी नमूद केले आहे.

(२) हे खरे नाही.

ब्रिटनमध्ये आढळलेल्या नवीन विषाणूच्या पार्श्वभूमीवर भारतात इंग्लंडहून येणाऱ्या प्रवाशांचे विशेष सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये १३ प्रवाशांमध्ये नवीन विषाणू प्रकार आढळून आला. तथापि, हे सर्व प्रवासी लक्षणे विरहित होते आणि त्यांना विमानतळावरच विलग केल्याने हा स्ट्रेन राज्यात पसरला नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

ब्रिटनमधून येणारी विमाने थांबविण्यात येऊन विमानातून आलेल्या प्रवाशांना हॉटेलमध्ये विलगीकरणात ठेवण्यात आले व नव्या विषाणूची लागण झालेल्या प्रवाशांना आयसीएमआर यांच्या निर्देशानुसार संस्थात्मक विलगीकरणात ठेवण्यात आले, हे खरे आहे.

त्यांचा ज्यांच्याशी संपर्क आला त्यांची तपासणी करण्यात येऊन त्यात कोरोनाच्या नवीन स्ट्रेनची रुग्ण संख्या वाढते आहे, हे खरे नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्रात इंग्लंड मधील विषाणू स्ट्रेन असलेले १३ प्रवासी आढळले.

(५) दिनांक २५ नोव्हेंबर ते २३ डिसेंबर या काळात इंग्लंडहून राज्यात आलेल्या ५०७३ प्रवाशांचा शोध घेण्यात आला. यापैकी कोरोनाबाधित असलेल्या ७८ लोकांपैकी १३ लोकांमध्ये ब्रिटनचा स्ट्रेन आढळून आला. या १३ पैकी २ व्यक्ती प्रवाशांच्या संपर्कातील होत्या. सर्व १३ व्यक्ती लक्षणे विरहित होत्या. आयसीएमआर मार्गदर्शक सूचनानुसार १४ दिवसांनंतर २ आरटीपीसआर चाचण्या निगेटिव्ह आल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आले.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाची पुनर्रचना करण्याबाबत

**(५३) * ७०२४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाची (सेन्सॉर बोर्ड) नियुक्ती मागील १ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिनिरीक्षण मंडळाची पुनर्रचना न झाल्यामुळे प्रायोगिक व व्यावसायिक बालनाट्ये, स्पर्धात्मक एकांकिका अशा एकूण ३०० ते ४०० संहिता परवानगीविना प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून अनेक मराठी कलावंतांचे व्यवसाय धोक्यात आल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने राज्यात रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाची (सेन्सॉर बोर्ड) पुनर्रचना करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
दिनांक १८/०१/२०२० रोजी मंडळावरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या रद्द केल्यानंतर दिनांक ११/०२/२०२० ते २४/०३/२०२० या कालावधीत अपवादात्मक परिस्थिती व तातडीची आवश्यकता म्हणून मनोरंजन प्रयोगासाठी सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ यांच्यास्तरावरुन शासनाच्या मान्यतेने परवानगी देण्यात आलेली आहे.
त्यानंतर कोरोना महासाथीच्या काळात दिनांक २४/०३/२०२० रोजी प्रथम लॉकडाऊन सुरु झाल्यापासून दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० पर्यंत (कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर "मिशन बिगीन अगेन" अंतर्गत नाटयगृहांना सांस्कृतिक कार्यक्रम पुन्हा सुरु करण्यास परवानगी देईपर्यंत) महाराष्ट्रात कोणताही नाटयप्रयोग सादर झाला नसल्यामुळे मराठी कलावंताचा व्यवसाय नाटयसंहिता प्रमाणित न झाल्यामुळे धोक्यात आला अशी परिस्थिती निदर्शनास आली नाही.
(३) शासन निर्णय, दिनांक १६ डिसेंबर, २०२० अन्वये मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे काळवली (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथील शाळकरी मुलाचा वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे मृत्यू झाल्याबाबत

**(५४) * ६९८८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे काळवली (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथील कु.प्रतिक प्रमोद महाडिक या १४ वर्षीय शाळकरी मुलाला दिनांक ९ सप्टेंबर, २०२० रोजी मध्यरात्री विषारी सर्पाने दंश केल्यामुळे त्याला पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये उपचारासाठी आणण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये डॉक्टर उपलब्ध नसल्याने त्याला महाड ग्रामीण रूग्णालयामध्ये उपचारासाठी पाठविण्यात आले असता उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, यापूर्वीही रायगड जिल्ह्यातील पोलादपूर शहरातील सैनिकनगर येथील सोनल संकेत लाड या बाळंतिणीवर पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामधील डॉक्टरांनी वेळेवर उपचार न केल्यामुळे तिचा दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी मृत्यू झाला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पोलादपूर ग्रामीण रूग्णालयात आरोग्य यंत्रणा सुसज्ज करण्यासाठी तसेच आवश्यक ते तज्ज्ञ डॉक्टर्स व कर्मचारी यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, महाड येथे उपचारादरम्यान मृत्यू झालेला आहे, हे खरे आहे. मात्र ग्रामीण रुग्णालय, पोलादपूर येथील वैद्यकीय अधिकारी यांनी रुग्णाला ग्रामीण रुग्णालय, महाड येथे संदर्भित केलेले आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

श्रीमती सोनाली संकेत लाड यांना उपजिल्हा रुग्णालय, माणगांव येथे संदर्भित केले हे खरे आहे. मात्र पूर्वीची बाळंतपणे सिझेरियन असल्याने यावेळीही सिझेरियन सुविधा उपलब्ध असलेल्या उपजिल्हा रुग्णालय, माणगांव येथे संदर्भित करण्यात आले. दिनांक २९/११/२०१९ रोजी सदर रुग्ण महिला उपजिल्हा रुग्णालय, माणगांव येथे भरती झाल्या होत्या. तथापि, प्रकृती चिंताजनक असल्याने जे.जे. रुग्णालय, मुंबई येथे संदर्भित करण्यात आले होते. जे.जे. रुग्णालय, मुंबई येथे उपचार सुरु असताना दिनांक ०१/१२/२०१९ रोजी मृत्यू झाला.

(४) व (५) कु. प्रतिक प्रमोद महाडिक यांच्या मृत्यू प्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांचेस्तरावरुन चौकशी सुरु आहे. श्रीमती सोनाली लाड यांच्या मृत्यू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत शासनस्तरावरून कार्यवाही सुरु आहे. तसेच वर्ग-३ मधील कर्मचारी यांची नियुक्ती करण्याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांचेस्तरावरुन सुरु आहे.

-----------------

## पळशी (ता.किनवट, जि.नांदेड) येथील आरोग्य उपकेंद्राचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५५) * ६७३३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळशी (ता.किनवट, जि.नांदेड) येथील आरोग्य उपकेंद्राचे काम गेल्या १० वर्षापासून प्रलंबित असून तेथील नागरिकांना आरोग्य सेवेपासून वंचित रहावे लागत असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर आरोग्य उपकेंद्राचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर उपकेंद्र ग्रामपंचायत इमारतीत कार्यरत असून उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांमार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.

(२) सदर उपकेंद्राचे काम पूर्ण झाले नसल्यामुळे तत्कालीन शाखा अभियंता व गुत्तेदार यांची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नेमण्यात आली होती. सदर चौकशीमध्ये उपकेंद्राच्या बांधकामाशी संबंधित तत्कालीन शाखा

अभियंता व गुत्तेदार यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली होती. परंतु संबंधितांवर कार्यवाही होण्याअगोदरच दोघेही मयत झाल्यामुळे त्याच्यावर पुढील कार्यवाही करता आलेली नाही.

सदर उपकेंद्राच्या बांधकामासाठी प्रादेशिक अनुशेष अंतर्गत सन २०२०-२०२१ मध्ये रुपये ४५.०० लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून बांधकामाबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एमबीबीएस डॉक्टरांप्रमाणेच आयुर्वेद आंतरवासिता डॉक्टरांना अतिरिक्त कोविड भत्ता देण्याबाबत

**(५६) * ६५९७ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात राज्यातील आयुर्वेद डॉक्टरांनी एमबीबीएस डॉक्टर यांच्यासमवेत काम केले असून कोविड-१९ काळात सेवा देणाऱ्या सर्व आंतरवासिता प्रशिक्षणार्थी डॉक्टरांना अतिरिक्त भत्ता देण्याचे आदेश शासनाने दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमबीबीएस आंतरवासिता डॉक्टरांना सन २०२० पासून सदरहू भत्ता लागू करण्यात आला असल्याने त्यांना दरमहा किमान रुपये २७ ते २८ हजार अतिरिक्त भत्ता देण्यात येतो, परंतु या विद्यार्थ्यांसोबत काम करणाऱ्या आयुर्वेद डॉक्टरांना याचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुर्वेद आंतरवासिता डॉक्टर विद्यार्थ्यांना अतिरिक्त कोविड भत्ता मिळावा यासाठी निमा स्टुडन्ट फॉरम, नागपूर यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आयुर्वेदिक आंतरवासिता डॉक्टरांना कोविड भत्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण देशात दिनांक २४/०३/२०२० पासून लॉकडाऊन जाहीर करण्यात आले होते. उक्त लॉकडाऊनव्दारे अनेक निर्बंध घातल्याने राज्याच्या कर व करेतर महसूलात घट होऊन राज्याच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला आहे. या वित्तीय स्थितीतून बाहेर पडून राज्याच्या अर्थव्यवस्थेला उभारी आणण्याचे राज्यासमोर आव्हान आहे. सबब, राज्यातील शासकीय महाविद्यालयातील कोविड कक्षामध्ये काम करणाऱ्या आंतरवासिता प्रशिक्षणार्थींना कोविड कालावधीमध्ये सध्याच्या नियमित रुपये ११०००/- इतक्या मासिक विद्यावेतनामध्ये वाढ करणे शक्य होत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या समतोल विकासासंदर्भात डॉ.विजय केळकर समितीने अहवालात सादर केलेल्या शिफारशीबाबत

**(५७) * ६६४४ श्री.विलास पोतनीस, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १४ मधील प्रश्न क्रमांक ६०१६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ, मराठवाडा यासह मागास भागातील अनुशेष दूर करण्याकरीता शासनास शिफारशी करण्यासाठी नेमलेल्या डॉ.विजय केळकर समितीने राज्याच्या विविध भागात भेटी देऊन तसेच लोकप्रतिनिधी आणि जनतेशी संवाद साधून तयार केलेला अहवाल माहे ऑक्टोबर, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालातील शिफारशींवर कार्यवाही करण्यात आली नसल्याने सदर अहवाल नामंजूर करुन विभागस्तरावर नव्याने अनुशेष काढण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त डॉ.केळकर समिती अहवालातील शिफारशींचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व सदर अहवाल रद्द करुन नव्याने समिती स्थापन करण्याचे कोणत्या कारणामुळे प्रस्तावित करण्यात आलेले आहे,
(४) असल्यास, समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समितीच्या अहवालातील शिफारशी व प्रशासकीय विभागाचे अभिप्राय विचारात घेवून शिफारशी स्वीकारण्यासंदर्भात गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय व सादर केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शिफारशींबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) व (२) होय, डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित उच्चस्तरीय समितीच्या अहवालामध्ये प्रदेश आणि क्षेत्रांमध्ये असुंतलता शोधणे आणि राज्यामध्ये समतोल विकास साधण्यासाठी शिफारस केलेली आहे. यासंदर्भात, मंत्रिमंडळ उपसमिती सन २०१५ मध्ये गठीत करण्यात आलेली असल्याने उपरोक्त अहवाल नामंजूर करून नव्याने प्रादेशिक आणि क्षेत्रामध्ये अनुशेष काढण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याची शासनाकडून कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.
(३) डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समतोल प्रादेशिक विकासाकरीता उच्चस्तरीय समितीच्या अहवालामध्ये प्रादेशिक नियतव्यय वाटप, आदिवासी क्षेत्राचा विकास, नवीन शेतीपध्दतीची आव्हाने, औद्योगिकरणाचा प्रसार, जलसंपत्तीचे निर्माण, आरोग्य व शिक्षण, व्यवस्था विस्तृत करणे अशा महत्वाच्या विषयाबाबत विविध शिफारशींचा समावेश आहे. यासंदर्भात प्रदेश आणि क्षेत्रांमध्ये असुंतलता शोधणे आणि राज्यामध्ये समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी मार्ग सूचविणे यासाठी मंत्रिमंडळ

उपसमिती सन २०१५ मध्ये गठीत करण्यात आलेली आहे. तथापि, वार्षिक कार्यक्रम सन २०२०-२०२१ करीता दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी मा.राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशामध्ये प्रदेश आणि क्षेत्रामध्ये असुंतलता शोधणे आणि राज्यामध्ये समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी मार्ग सूचविणे यासाठी समिती स्थापन करावी याचाही समावेश केला आहे.

(४), (५) व (६) डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समतोल प्रादेशिक विकासाकरीता उच्चस्तरीय समितीच्या अहवालामधील शिफारशींसंदर्भात संबंधित प्रशासकीय विभागांचे अभिप्राय विचारात घेऊन, अहवालातील शिफारशी स्वीकारण्यासंदर्भात मंत्रिमंडळ उपसमिती सन २०१५ मध्ये गठित करण्यात आली आहे. मंत्रिमंडळ उपसमितीकडून अहवालामधील शिफारशी स्वीकारण्यासंदर्भात अद्याप मंत्रिमंडळास अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

-----------------

## धारुर (जि.बीड) येथील किल्ल्याच्या दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(५८) * ७४२९ श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारुर (जि.बीड) येथील किल्ल्याच्या दुरुस्तीचे काम औरंगाबाद येथील गायत्री कन्स्ट्रक्शन यांना दिले असून या कामासाठी रुपये ५ कोटीचा निधी खर्च झाला असून निकृष्ट दर्जाचे काम केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराने सदोष बांधकाम केल्यामुळे किल्ल्याच्या काही भिंती कोसळल्याने पुरातत्व विभागाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या औरंगाबाद येथील गायत्री कन्स्ट्रक्शनवर कारवाई करुन सदर दुर्गम किल्ल्याचे जतन व संवर्धन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे अंशत: खरे आहे.

नोव्हेंबर, २०१६ ते मार्च, २०१७ या कालावधीत बांधण्यात आलेल्या तटबंदीचा काही भाग जोरदार पर्जन्यवृष्टीमुळे कोसळला आहे.

(२) दायित्व कालावधीमध्ये किल्ल्याच्या तटबंदीची पडझड झाल्यामुळे कंत्राटदाराकडून सदर तटभिंतीचे काम विनामोबदला करून घेण्यात येत आहे.

(३) या स्मारकाच्या जतन दुरूस्ती कामाबाबत सखोल चौकशी करून वस्तु:स्थितीदर्शक खुलासा सादर करण्याबाबत तसेच या कामाबाबत जबाबदारी निश्चित करण्याबाबत संचालक, पुरातत्व व वस्तूसंग्रहालये संचालनालयास दिनांक १०/११/२०२० च्या पत्रान्वये आदेश देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया आरोग्य विभागाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत

**(५९) * ७३२७ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया आरोग्य विभागात कोरोना काळात अपुऱ्या मनुष्यबळाला मदत मिळावी म्हणून तीन-तीन महिन्याच्या कंत्राटी तत्वावर डॉक्टर, नर्स, लॅब टेक्निशियन, औषध निर्माता, वॉर्ड बॉय, डीईओ अशी १०४ पदे कंत्राटी पध्दतीने माहे ऑगस्ट, २०२० मध्ये भरती करण्यात आली असून उपरोक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाने कायम करावे अशी मागणी आरोग्य संघटनेने शासनाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने २५ टक्क्यापेक्षा कमी रुग्णसंख्या असलेल्या जिल्हयातील या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नोकरीतून कमी करा असे निवेदन सर्व जिल्हयांना दिले आहे, परंतु जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी कर्मचाऱ्यांना कमी करणार नाही तर त्यांना राष्ट्रीय आरोग्य अभियान किंवा इतर कंत्राटी स्वरुपाच्या कामात समाविष्ट करण्याचे निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गोंदिया आरोग्य विभागाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी न करता राष्ट्रीय आरोग्य अभियान किंवा इतर कंत्राटी स्वरुपाच्या कामात समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोयना धरणातील पाणी कोकणवासियांना उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६०) * ६५९३ श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोयना धरणातून वीजनिर्मिती सुरु झाल्यापासून कोयना धरणाचे ६७ टीएमसी इतके पाणी वाया जाऊन अरबी समुद्रात मिळते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे वाया जाणारे पाणी कोकणात वळवून पाणी टंचाई व सिंचनासाठी वापर करण्यात यावा व त्यानंतर अन्य ठिकाणी त्याचा वापर करण्यात यावा, अशी मागणी कोकणातील स्थानिक लोकप्रतिनिधी व कोकणवासियांकडून गेल्या अनेक वर्षापासून शासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री कोयना विद्‌युतगृहाची पाहणीसंदर्भात दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास शासकीय दौऱ्यावर असताना रत्नागिरी जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी तशा आशयाचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांना त्याच दिवशी दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाधीन मागणीच्या अनुषंगाने कोयना धरणाचे पाणी प्रथम कोकणासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

कोयना धरणातील सुमारे ६७.५० अब्ज घनफूट पाणी वीज निर्मितीनतंर वाशिष्ठी नदीमध्ये सोडण्यात येते. यापैकी सिंचन व बिगर सिंचनासाठी काही पाण्याचा उपयोग केला जातो व उर्वरीत पाणी समुद्रास जावून मिळते.
(२) होय, हे खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील आमदार व इतर स्थानिक लोकप्रतिनिधींची कोयना अवजलाचा वापर कोंकणामध्येच सिंचन व बिगरसिंचन कारणासाठी करण्याबाबत आग्रही मागणी आहे.
(३) अशा प्रकारचे निवेदन जलसंपदा विभागास अद्याप प्राप्त झाले नाही.
(४) रत्नागिरी जिल्ह्यातील वाशिष्ठी नदीमध्ये कोयना धरणातून वीज निर्मितीनंतर उपलब्ध होणारे ६७.५० अ.घ.फूट पाणी सिंचन व बिगर सिंचनासाठी वापरात आणण्याच्या दृष्टीने विविध विभागांमार्फत अभ्यास प्रगतीपथावर असून, सदर अभ्यासाच्या निष्कर्षांवरून प्रकल्प राबविण्याबाबत निर्णय घेणे शक्य आहे.

कोयना अवजलाचा वापर रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर व ठाणे जिल्हयातील सिंचन/बिगरसिचंन क्षेत्रासाठी तसेच मुंबई शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी करण्याचे दृष्टीने प्रकल्प राबविणेसाठी अभ्यास करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(६१) * ७३०५ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात एकूण अठ्ठावीस पदांपैकी वैद्यकीय अधीक्षक, नेत्र चिकित्सक अधिकारी यांचेसह डॉक्टर, मल मूत्र व रक्त तपासणी टेक्निशियन आणि परिचारीका अशी पंधरा पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील रिक्त पदांमुळे येथे येणाऱ्या रुग्णांना योग्य औषधोपचार मिळत नसल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मारेगाव ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) अंशत: खरे आहे.

आकृतिबंधानुसार ग्रामीण रुग्णालयात नेत्र चिकित्सक अधिकारी पद मंजूर नाही. तथापि, ग्रामीण रुग्णालय वणी येथील नेत्र चिकित्सक अधिकाऱ्यांच्या सेवा आठवड्यातून २ दिवस मारेगाव ग्रामीण रुग्णालयाला देण्यात आल्या आहेत. वैद्यकीय अधीक्षकाचे एक पद रिक्त आहे तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मंजूर पदापैकी २ पदे भरलेली असून एक पद रिक्त आहे. तथापि, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत २ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरली आहेत. तसेच प्रयोगशाळा तंत्रज्ञांची सेवा कंत्राटी तत्वावर उपलब्ध करुन दिली आहे. सदर रुग्णालयात एकूण २८ मंजूर पदांपैकी १६ पदे जरी रिक्त असली तरी त्यापैकी ४ पदे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी स्वरुपात भरण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय मारेगाव, जि.यवतमाळ येथे औषधाचा पुरेसा साठा उपलब्ध असून, अत्यावश्यक वेळी रुग्ण कल्याण समितीमधून जीवनावश्यक औषधे उपलब्ध करुन दिली जातात. तसेच उपलब्ध अधिकारी/कर्मचारी यांचेकडून येणाऱ्या रुग्णांना आवश्यक त्या सर्व रुग्ण सेवा पुरविण्यात येतात. त्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना योग्य औषधोपचार मिळत असून त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र वैद्‌यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

महारष्ट्र वैद्‌यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्‌यकीय अधिकारी यांची रिक्त पदे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा समितीमार्फत कंत्राटी तत्वावर भरण्यात येतात तसेच Walk-in-Interview व्दारे वैद्‌यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यात येत आहेत.

तसेच, गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर तालुक्यातील बहुतांश ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नसल्याबाबत

**(६२) * ६७०४ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामसेवकाने मुख्यालयाच्या ठिकाणी राहणे बंधनकारक असताना पालघर तालुक्यातील बहुतांश ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हे मुख्यालयी राहत असल्याचे बनावट दाखले देऊन शासनाची फसवणूक करीत असल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक नागरिकांकडून करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पालघर तालुक्यातील ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील निरीक्षणगृहे, बालगृहे, खुले निवारागृहे व विशेष दत्तक संस्था यात राहणाऱ्या बालकांच्या परिपोषण अनुदान देण्याबाबत

**(६३) * ७६८२ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निरीक्षणगृहे, बालगृहे, खुले निवारागृहे व विशेष दत्तक संस्था यात राहणाऱ्या बालकांसाठी दरमहा दोन हजार रुपये याप्रमाणे लागू असणाऱ्या परिपोषण अनुदानाच्या दरात वार्षिक ८ टक्के वाढ करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अशी किती निरीक्षणगृहे, बालगृहे, खुले निवारागृहे व विशेष दत्तक संस्था आहेत व त्यात किती बालके राहत आहेत,

(३) तसेच, ही योजना केव्हापासून अंमलात येणार आहे व यावर किती खर्च अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१), (२) व (३) एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत राज्यातील निरीक्षणगृहे, बालगृहे, खुले निवारागृहे व विशेष दत्तक संस्था यातील दाखल प्रवेशितांसाठी प्रतिबालक प्रतिमाह रुपये २,०००/- याप्रमाणे लागू असणाऱ्या परिपोषण अनुदानाच्या दरात वार्षिक ८% याप्रमाणे वाढ करण्यास शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग दिनांक ०५/०२/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत प्रत्येकी ५० प्रवेशित क्षमतेची ३७ शासकीय बालगृहे/ निरीक्षणगृहे व ४० स्वयंसेवी बालगृहे/निरीक्षणगृहे असून त्यात १४४२ प्रवेशित दाखल आहेत, प्रत्येकी २५ प्रवेशित क्षमतेची ७ खुले निवारागृहे असून त्यात ७७ प्रवेशित दाखल आहेत आणि प्रत्येकी १० प्रवेशित क्षमतेच्या १७ विशेष दत्तक संस्था कार्यरत असून त्यात १६३ प्रवेशित दाखल आहेत.

प्रवेशितांच्या क्षमतेनुसार परिपोषण दरात वार्षिक ८% याप्रमाणे वाढ केल्यास खर्चात एकूण अंदाजे रुपये ७८,११,०००/- इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. सदर सुधारणा सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षापासून लागू होतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला, बुलढाणा व वाशिम या जिल्हयामध्ये जलयुक्त शिवार योजनेत अनियमितता झाल्याबाबत

**(६४) * ६९६८ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, बुलढाणा व वाशिम या तीन जिल्हयामध्ये शासनाने जलयुक्त शिवार योजना राबविताना प्रामुख्याने विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली वेगवेगळ्या १३ यंत्रणामार्फत जलयुक्त शिवाराचे ६०० कोटींचे काम प्रस्तावित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्हयामध्ये जलयुक्त शिवारात गैरव्यवहार व अनियमितता तसेच मोजमापाप्रमाणे ज्या जमिनीवर शिवार करायचे आहे त्याचे सर्वेक्षण न करता सरसकट केल्याची तक्रार या भागातील शेतकरी व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे व जिल्हा प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासन व जिल्हा प्रशासनामार्फत या योजनेची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय, दिनांक १ डिसेंबर, २०२० अन्वये जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या कामांची खुली चौकशी करण्याबाबत समिती गठीत करण्यात आली असून समितीच्या कार्यकक्षेत येणाऱ्या सदर जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत प्राप्त तक्रारी पुढील कार्यवाहीकरीता समितीकडे देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यात कुष्ठरोगविरोधी मोहिम राबविण्याबाबत

**(६५) * ६८९९ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात कुष्ठरोगविरोधी मोहिम सार्वजनिक आरोग्य विभागाकडून राबविण्यात येत असून त्यानुसार ३ लाख १९ हजार ८५४ घरांची तपासणी केली असता या ९ दिवसांच्या तपासणीत ६२ कुष्ठरुग्ण आढळले असल्याची माहिती दिनांक ९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मोहिमेंतर्गत संपूर्ण कुष्ठरोग निर्मुलनासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

दिनांक ०१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीत संपूर्ण राज्यात कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात आले यामध्ये दिनांक ९ डिसेंबर, २०२० अखेर पालघर जिल्ह्यामध्ये एकूण ३ लाख ६० हजार ३०५ घरांची आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात असून त्यामध्ये एकूण ८८ नवीन कुष्ठरुग्ण शोधण्यात आले.

(२) या मोहिमेंतर्गत संपूर्ण कुष्ठरोग निर्मुलनासाठी शासनाने खालील उपाययोजना केल्या आहेत.

१) अभियानात आढळलेल्या सर्व कुष्ठरुग्णांना त्वरित मोफत बहुविध औषधोपचार सुरु करण्यात आले आहेत.
२) त्यांच्या सहवासितांवर प्रतिबंधात्मक उपचार करण्यात आले आहे.
३) आरोग्य कर्मचाऱ्यांकडून राज्यामध्ये नियमित सर्वेक्षण करण्यात येत आहे.
४) या रोगाचे लवकर निदान होण्यासाठी विविधस्तरावर जनजागृती करण्यात आली आहे.
५) दिनांक ८ फेब्रुवारी, २०२१ पासून राज्यात सक्रिय कुष्ठरोग शोध अभियान व नियमित सनियंत्रण हा कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील पुर्णा पाटबंधारे विभागांतर्गत येणाऱ्या पुर्णा व लासिना शाखेच्या कालवा दुरूस्तीच्या कामाबाबत

**(६६) * ७१५८ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील पुर्णा पाटबंधारे विभागांतर्गत येणाऱ्या पुर्णा व लासिना शाखेच्या कालवा दुरूस्तीचे काम अधिकाऱ्यांच्या समन्वयाअभावी व चुकीच्या नियोजनामुळे प्रलंबित असून पुर्णा पाटबंधारे विभाग कालवा दुरूस्तीविनाच शेती सिंचनासाठी पाणी सोडण्याची घाई करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येलदरी व सिध्देश्वर जलाशयाच्या पुर्णा पाटबंधारे विभागाच्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये दिनांक ७ ते १६ डिसेंबर, २०२० मध्ये नियोजन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाटबंधारे विभागातील संबंधित अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे पुर्णा तालुक्यातील शेतकरी पाण्यापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मुख्य कार्यकारी अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) हे खरे नाही.

सन २०२०-२०२१ या वर्षी रब्बी हंगामापूर्वी पाखरण कार्यक्रमांतर्गत यांत्रिकी विभागामार्फत कालवा स्वच्छता अभियानांतर्गत नियोजनानुसार पुर्णा व लासिना शाखा कालव्याचे अत्यावश्यक कामे करुन सिंचनासाठी कालव्याव्दारे पाणी सोडण्यात आले आहे.

(२) दिनांक १९ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीतील मंजूर नियोजनाप्रमाणे दिनांक २५/११/२०२० रोजी पुर्णा प्रकल्पाची प्रथम पाणीपाळी सुरु करुन त्यानुसार लासिना शाखा कालव्यास दिनांक ०७/१२/२०२० रोजी पाणी सोडण्यात आले आहे.

तद्नंतर दिनांक ०७/०१/२०२१ व दिनांक १०/०२/२०२१ रोजी अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या पाणीपाळीनुसार लासिना शाखा कालव्यास पाणी सोडण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

पूर्णा प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीतील नियोजनानुसार रब्बी हंगामामध्ये एकूण तीन पाणीपाळया देण्यात आल्या आहेत.

(४) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे तुळस जैतिर मंदिर (ता.वेगुर्ले, जि.सिंधदुर्ग) येथील बागायती, शेतीसाठी उभारलेले संरक्षक दगडी कंपाऊंड तोडल्याबाबत

**(६७) * ७८४० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तुळस जैतिर मंदिर रस्ता (ता.वेगुर्ले, जि.सिंधदुर्ग) या २.२०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामास शासनाने रुपये १४८.६६ लक्ष मंजूर करुन रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०१८-२०१९ मध्ये साखळी क्र. १/८०० ते १/९६० या लांबीमध्ये रस्ता डांबरीकरणासाठी जमीन संपादन करताना जमिनी भूमापन क्रमांक १४६/२ व १४५/८, वर्ग-१ मध्ये बागायती, शेतीसाठी उभारलेले संरक्षक दगडी कंपाऊंड तोडल्याने या भागातील शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सदरचे १२० मी. लांबीचे पक्के दगडी कंपाऊंड बांधुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एकात्मिक राज्य जल आराखड्यानुसार मराठवाड्यात पाणी वितरण करण्याबाबत

**(६८) * ७८५० श्री.संजय दौंड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी खोरे जल आराखड्याचा अभ्यास करुन एकात्मिक राज्य जल आराखडा माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्याकरीता २८.८५ पैकी १३.८४ टीएमसी पाणी वितरणाचा प्रस्ताव मंजूर करण्यात येऊन १५.०० टीएमसी पाणी मंजुरीचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे काय, असल्यास केव्हापासून,
(३) तसेच, सदर प्रस्ताव प्रमाणित करण्यासाठी शासनाने महासंचालक मेरी, नाशिक यांच्याकडे दिनांक ६ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय.

राज्यातील गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा, पश्चिमवाहिनी (कोकण) व महानदी या नदीखोऱ्यांच्या आराखड्यांचे एकत्रिकरण करुन एकात्मिक राज्य जल आराखडा तयार करणेत आला. सदर आराखड्यास मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ११/०२/२०१९ रोजी झालेल्या राज्य जल परिषदेच्या सहाव्या बैठकीत मान्यता प्रदान करणेत आली आहे.
(२) अंशत: खरे आहे.

मंजूर एकात्मिक राज्य जल आराखडा Annexure १०.१ (a) नुसार मध्य गोदावरी खोऱ्यात उर्वरीत मध्य गोदावरी खोऱ्यातील ३७९ दलघमी (१३.३८अ.घ.फू) व मध्य गोदावरी खोऱ्याचा भाग असलेल्या सुधा खोऱ्यात १३ दलघमी (०.४६ अ.घ.फू) असे एकूण ३९२ दलघमी (१३.८४ अघफू) पाणी शिल्लक असल्याचे नमूद आहे. तथापि, एकात्मिक गोदावरी खोरे जल आराखडा परिच्छेद १०/०१/९.२ मध्ये नमूद केलेनुसार प्रत्यक्ष ७५% विश्वासार्हतेनुसार येवा व Consumptive वापरानुसार मोजमापन केल्यास २५.४४ अघफु पाणी शिल्लक दिसते. राज्य जल परिषदेच्या सहाव्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार “राज्यास अनुज्ञेय पूर्ण पाणी वापराचे योग्य नियोजन करावे” असे निर्देश आहेत. त्यानुसार कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे दिनांक १५/०२/२०२०

चे पत्रान्वये एकात्मिक राज्य जल आराखडा खंड II मधील मंजूर प्रकल्पाचे पाणी वापराची माहिती लवादाने दिलेल्या परिगणन सुत्रानुसार परिगणित करुन उपखोरेनिहाय Consumptive पाणी वापर व त्यानुसार उपलब्ध होणारे पाणी याबाबत माहिती शासनास सादर केली. त्यानुसार शासन पत्र दिनांक २३/०४/२०२० व २४/०९/२०२० अन्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद व कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना Consumptive पाणी वापर व त्यानुसार अतिरिक्त शिल्लक पाणी वापर परिगणन तक्ते/आकडेवारी महासंचालक मेरी, नाशिक यांचेकडुन प्रमाणित करुन सादर करणेबाबत निर्देश देणेत आले आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

शासन निर्देशानुसार मध्य गोदावरी उपखोऱ्यातील प्रकल्पांचे पुनर्नियोजन प्रस्ताव कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक ६/५/२०२० चे पत्रान्वये महासंचालक, मेरी, नाशिक यांचेकडे प्रमाणित करणेसाठी सादर केला आहे.

(४) शासन पत्र दिनांक २३/०४/२०२० व २४/०९/२०२० अन्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद व कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना गोदावरी खोऱ्यातील Consumptive पाणी वापर व त्यानुसार अतिरिक्त शिल्लक पाणी वापर परिगणन तक्ते/आकडेवारी महासंचालक मेरी, नाशिक यांचेकडुन प्रमाणित करुन सादर करणेबाबत निर्देश देणेत आले आहेत. तसेच मा.मंत्री जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१/१२/२०२० रोजी झालेल्या बैठकीत तूर्त मध्य गोदावरी खोऱ्यात Consumptive वापरानुसार शिल्लक पाणी वापराच्या अंतरिम प्रस्तावास मान्यता द्यावी. त्यासाठी आवश्यक परिगणन तक्ते महासंचालक, मेरी, नाशिक यांनी प्रमाणित करुन द्यावे असे निर्देश दिले असून त्यानुसार मध्य गोदावरी खोऱ्यात Consumptive वापरानुसार २.८ अ.घ.फू पाणी शिल्लक असल्याचे महासंचालक, मेरी, नाशिक यांनी दिनांक ०२/०२/२०२१ चे पत्रान्वये प्रमाणित करून प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काटोल व रामटेक (जि.नागपूर) पंचायत समिती अंतर्गत सायकल खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६९) * ७११५ श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषद शिक्षण विभाग, काटोल व पंचायत समिती, रामटेक अंतर्गत सन २०१९-२०२० या वर्षात आठवी ते बारावीपर्यंतच्या शिक्षण घेणाऱ्या मुलींकरीता शाळास्तरावरुन सायकल खरेदी करताना गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खरेदी केलेल्या सायकलींचे अधिकृत देयक नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

(२) नाही.

मानव विकास कार्यक्रम या योजनेंतर्गत मुलींना मोफत सायकल वाटपाबाबत देण्यात येणारा निधी जिल्हा परिषद, नागपूर स्तरावरुन आर.टी.जी.एस.व्दारे मुख्याध्यापकांच्या खात्यामध्ये जमा केला जातो. त्यानंतर मुख्याध्यापक लाभार्थी मुलींच्या खात्यामध्ये आर.टी.जी.एस/चेक व्दारे निधी जमा करतात. त्यानंतर लाभार्थी मुली एकाच दुकानातून किंवा वेगवेगळया दुकानातून सायकल खरेदी करुन संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडे सायकलची पावती जमा करतात.

त्यानंतर संबंधित मुख्याध्यापकांनी सायकल खरेदी पावतीची झेरॉक्स प्रत, मुलींना सायकल वाटप केल्याचा फोटो आणि उपयोगिता प्रमाणपत्र इ. गटसाधन केंद्र, शिक्षण विभाग काटोल व रामटेक येथे जमा केलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा उजवा व डावा कालव्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(७०) * ७८२७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा उजवा व डावा कालव्याच्या वितरण प्रणालीसाठी रुपये १०५ कोटी भरुनही सदरचा प्रस्ताव मंजुरी अभावी प्रलंबित असल्यामुळे दोन्ही कालव्यांवरील चाऱ्यांची कामे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कालव्याच्या प्रस्तावाबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय.

भातसा प्रकल्पासाठी मुमरी धरण घाट रस्ता व कालवे याकरीता एकूण ६८१.५८९ हे. वन जमिनीच्या नक्त वर्तमान मूल्यापोटी (NPV) रुपये १०४.९४ कोटी रक्कम मे, २०१३ मध्ये वन विभागास अदा करणेत आली आहे.

(२) एकूण ६८१.५८९ हे. वन जमिनीपैकी मुमरी धरण व घाट ४१२.१३५ हे. वनक्षेत्राबाबत अंतिम मान्यता मे, २०१४ मध्ये प्राप्त आहे. कालव्यांकरीता आवश्यक २६९.४५४ हे. वन जमिनीच्या अंतिम मान्यतेसाठी आवश्यक सर्व बाबींची पूर्तता करुन मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक १६/१०/२०२० च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला असून, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाची मान्यता मिळण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील सिंचनाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(७१) * ६६३२ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील सिंचनाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन वर्षात झालेल्या पावसाची वार्षिक सरासरीची दुप्पट नोंद होवून सिंचन प्रकल्प तुडुंब भरले असूनही पाणी अडविण्याच्या उपाययोजना नसल्याने पाणी वाहून जात असल्याचे तसेच बहुतांश बंधाऱ्यांना दरवाजे नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

मृद व जलसंधारण विभाग, औरंगाबाद विभागाकडील पाझर तलाव/को.प.बं/सिमेंट बंधारे सिंचन प्रकल्पांमध्ये मागील २ वर्षातील पावसाळ्यात पाणीसाठा झाला आहे व को.प.बंधाऱ्यांचे दरवाजे सुस्थितीत आहेत.

जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागांतर्गत असलेल्या १९३ को.प.बंधाऱ्यापैकी १४८ को.प. बंधाऱ्यांना दरवाजे बसवून पाणीसाठा करण्यात आला आहे. उर्वरित ४५ बंधाऱ्यांपैकी ३० को.प. बंधाऱ्यांना दरवाजे उपलब्ध नाहीत व १५ को.प. बंधाऱ्यांची स्थापत्य विषयक दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

३० को.प. बंधाऱ्यांना नवीन दरवाजे तसेच १५ को.प. बंधाऱ्यांची स्थापत्य विषयक दुरुस्ती प्रस्तावित असून दुरुस्ती अंदाजपत्रके मुख्यमंत्री जलसंवर्धन कार्यक्रमांतर्गत व जिल्हा परिषदेच्या सेस निधीमधून सादर केली आहेत. प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ही कामे करण्यात येणार आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे फायर व इलेक्ट्रीक ऑडीट करण्याबाबत

**(७२) * ७९७४ अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा येथील सिव्हील रुग्णालयास लागलेल्या आगीत १० नवजात बालकांचे मृत्यू झाल्यानंतर शासनाने रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्राचे फायर व इलेक्ट्रीक ऑडिट करण्याची सक्ती राज्यातील यंत्रणांवर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेच्या ३३ प्राथमिक आरोग्य केंद्राचे फायर व इलेक्ट्रीक ऑडीट झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्राचे फायर व इलेक्ट्रीक ऑडीट न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्राथमिक आरोग्य केंद्राचे फायर व इलेक्ट्रीक ऑडीटचे काम विनाविलंब हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम जिल्हा परिषद, ठाणे यांचेमार्फत इलेक्ट्रीक ऑडीट व अग्निशमन विभाग कल्याण, मुरबाड, बदलापूर, डोंबिवली, भिवंडी यांचेमार्फत प्राथमिक आरोग्य केंद्राचे फायर ऑडीट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड व औरंगाबाद, जिल्हा परिषदेंतर्गत अनुसूचित जमाती मधील पात्र शिक्षण सेवकांना नियुक्त्या देण्याबाबत

**(७३) * ६९५३ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड व औरंगाबाद, जिल्हा परिषदेंतर्गत विशेष भरती मोहिमेंतर्गत मोहिम २०२० शिक्षण सेवक या पदासाठी उमेदवारांच्या छाननी तपासणी सूची माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान दर्शविण्यात आली असून त्याबाबतचे आक्षेप स्वीकारण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी प्रवर्गातील अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करून त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर भरती करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीड व औरंगाबाद, जिल्हा परिषद येथील निवड झालेल्या पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय.
(२) होय.
(३) जिल्हा परिषद बीड अंतर्गत आदिवासी प्रवर्गातील अनुसूचित जमातीची जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग केल्यामुळे त्यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या

याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने ५ शिक्षकांना अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या आदेशास अंतरिम स्थगिती दिली असल्याने संबंधिताना नियुक्ती आदेश देण्यात आलेले नाहीत.

तसेच जिल्हा परिषद, औरंगाबाद मधील अनुसूचित जमातीच्या विशेष भरती मोहिमेंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर वित्त विभागाच्या दिनांक ०४/०५/२०२० च्या पद भरतीवरील निर्बंधाच्या अनुषंगाने उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले नाहीत. यानुषंगाने अनुसूचित जमातीच्या विशेष भरती मोहिमेंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता वित्त विभागाने प्रस्तावित संवर्ग व पदांची संख्या याबाबत सविस्तर तपशिल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार सर्व जिल्हा परिषदेकडून अधिसंख्य पदावरील प्रलंबित नियुक्त्यांबाबतची माहिती शासन पत्र दिनांक १८/०२/२०२१ अन्वये मागविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हारळ (ता.कल्याण, जि.ठाणे) ग्रामपंचायतीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७४) * ७९८९ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हारळ (ता.कल्याण, जि.ठाणे) ग्रामपंचायतीतील सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांनी सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात एक करोड रुपयांचा अपहार केल्याचे कनिष्ठ लेखा परिक्षकांच्या अहवालानुसार माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवकांवर कारवाई करुन गैरव्यवहाराची रक्कम वसूल करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी गटविकास अधिकारी, कल्याण यांना देवूनही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हारळ ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी माजी सरपंच यांनी कोकण विभागीय आयुक्तांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करुन गैरव्यवहाराची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ग्रामपंचायत म्हारळ ता.कल्याण या ग्रामपंचायतीच्या सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षाच्या लेखा परिक्षणात निदर्शनास आलेल्या कायमस्वरुपी अपहार रक्कम रुपये २,४७,६०१/- पैकी रक्कम रुपये १,५३,०००/- मात्र संबंधितांकडून वसुली करण्यात आली असून उर्वरित रकमेच्या वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशोब तपासणी) नियम १९६१ च्या नियम १९ अन्वये संशयित अपहाराच्या मुदयांबाबत पंचायत समिती, कल्याण स्तरावर ग्रामपंचायतीकडून प्राप्त होणारे अनुपालनानुसार दस्ताऐवजांची पडताळणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) गटविकास अधिकारी, पंचायत समिती कल्याण यांचेकडील सखोल चौकशी अहवालानुसार तक्रारदाराने उपस्थित केलेल्या मुदयांबाबत उपलब्ध दस्ताऐवजांच्या आधारे अनियमितता केल्याचे स्पष्ट झाल्याने तत्कालीन संबंधित जबाबदार सरपंच, ग्रामपंचायत म्हारळ यांचेविरुध्द विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा मुंबई अधिनियम क्र.३) कलम ३९(१) अन्वये कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे. तत्कालीन दोषी ग्रामसेवक यांचेविरुध्द उचित प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जीवनदायी आरोग्य विमा संरक्षण लागू करण्याबाबत

**(७५) * ६५६७ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा ज्योतिराव फुले जीवनदायी आरोग्य विमा योजनेंतर्गत अडीच कोटी कुटुंबांना दीड लाख रुपयांचे आरोग्य विमा संरक्षण देण्याबाबतचा प्रस्ताव गत एक वर्षापासून सार्वजनिक आरोग्य विभागाकडे मंजूरीसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व तो मंजूर करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रस्तावावर निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभाग, दिनांक २६/०२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेशी संलग्नीकरण करून दोन्ही योजना राज्यात दिनांक ०१/०४/२०२० पासून राबविण्यात येत आहेत.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत पिवळी, अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा योजना शिधापत्रिकाधारक कुटुंबे आणि केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबे (रुपये १.०० लक्षापर्यंत वार्षिक उत्पन्न असलेली) तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंब तसेच शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी, शासकीय महिला आश्रमातील महिला, शासकीय अनाथ आश्रमातील मुले, शासकीय वृध्दाश्रमातील ज्येष्ठ नागरिक, माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील

निकषानुसार पत्रकारांचा व त्यांच्या कुटुंबांचा आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळातील नोंदणी कार्यान्वित असलेले बांधकाम कामगार या लाभार्थी घटकांना प्रति कुटुंब प्रति वर्ष रुपये १.५ लक्ष रकमेपर्यंत व मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी रुपये २.५ लक्ष रकमेपर्यंत वैद्यकीय उपचार अंगीकृत रुग्णालयात अनुज्ञेय आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाढत्या रक्तक्षयाचे प्रमाण रोखण्याबाबत

**(७६) * ७०३४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रशांत परिचारक** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५६ टक्के बालके, गरोदर माता आणि महिला रक्तक्षयाने (ॲनिमिया) त्रस्त राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या अहवालातून निदर्शनास आल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-२०१६ मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणाच्या तुलनेत रक्तक्षयाने त्रस्त असणाऱ्यांचे प्रमाण ६ टक्यांहून अधिक वाढले असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ॲनिमिया मुक्त भारत ह्या केंद्र शासनाच्या घोषणेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात जिल्हास्तरीय यंत्रणेकडून होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील वाढत्या रक्तक्षयाचे प्रमाण रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

तथापि, सन २०१५-२०१६ मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणाच्या तुलनेत १५-४९ वर्षे वयोगटातील गरोदर मातांमधील रक्तक्षयाच्या प्रमाणात ३.६ टक्क्याने घट झाली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) ॲनिमिया मुक्त भारत कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनानुसार उपाययोजनांबाबत जिल्हास्तरीय यंत्रणेकडून रक्तक्षयाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येतात. :-

१. ॲनिमिया मुक्त भारत कार्यक्रम :- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार ०६-५९ महिने या वयोगटातील आणि ०६-१० वर्षे वयोगटातील बालकांना, १०-१९ वर्षे किशोरवयीन वयोगटातील मुला-मुलींना, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता व प्रजननक्षम वयोगटातील महिला यांना आयर्न व फॉलिक ॲसिडची प्रतिबंधात्मक पुरक मात्रा देण्यात येते तसेच हिमोग्लोबीन तपासणी करण्यात येते.

२. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम :- या कार्यक्रमांतर्गत फिरते वैद्यकीय पथकांमार्फत राज्यभरातील शासकीय व निमशासकीय शाळा व अंगणवाड्यामधील बालकांची ४ Ds अंतर्गत (डिसीज, डिफीशियन्सी, डिफॉरमेटी व डेव्हलपमेंटल डिले) तपासणी करण्यात येते ज्यामध्ये रक्तशयाची सुध्दा तपासणी करण्यात येते.

३. जंतनाशक मोहिम :- राज्यातील सर्व जिल्हयातील ग्रामीण व शहरी भागात एकाच वेळी वर्षातून दोनवेळा ०१ ते १९ वर्षे वयोगटातील बालकांना जंतनाशक औषध देण्यात येते.

४. प्रत्येक मातेस रक्तक्षय नसल्यास प्रसुतीपूर्व व प्रसुतीपश्चात दररोज १ यानुसार १८० गोळया तसेच रक्तक्षय असल्यास प्रसुतीपूर्व व प्रसुतीपश्चात दररोज २ गोळया अशा ३६० गोळया देण्यात येतात.

५. गरजेनुसार तीव्र रक्तक्षय असलेल्या मातांना शिरेव्दारे इंजे. आयर्न सुक्रोजही देण्यात येते.

६. गरोदर मातेस पहिल्या तिमाही नंतर Albendazole ४०० mg ची १ गोळी देण्यात येते.

७. मानव विकास कार्यक्रमांतर्गत गरोदर मातांची स्त्रीरोग तज्ञांकडून वेळोवेळी तपासणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रोहा (जि.रायगड) तालुक्यातील कुंडलिका सिंचनाखालील उजवा तीर, डावे तीर कालव्याची कामे पूर्ण करण्याबाबत

**(७७) * ६९९१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील कुंडलिका सिंचनाखालील उजवा तीर, डावे तीर कालव्याची कामे गत ८ ते १० वर्षांपासून डोलवहाळ पाटबंधारे विभागाकडून सुरू असून पूर्ण झाली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याची साफसफाई न झाल्याने कालव्यात मोठ्या प्रमाणात झाडे वाढलेली असून कालवे माती व घनकचऱ्यांनी भरलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोलाड पाटबंधारे विभागाने कालवा, मोऱ्या व लायनिंगवर करोडो रूपये खर्च करूनही आजपर्यंत सिंचनाखालील शेतकऱ्यांना पाणीपुरवठा झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नदीकाठी गावे असूनही पाण्याची टंचाई असल्यामुळे अनेक वर्षे शेतकरी दुबार भातपिकांसह भाजीपाला, कडधान्य पिकांपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कुंडलिका सिंचनाखालील उजवा तीर व डावे तीर कालव्याची कामे पूर्ण करून कालव्याव्दारे शेतकऱ्यांना पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत सदर कालव्यांवरील काही बांधकामे तसेच अस्तरीकरणाची कामे सन २०१०-२०११ मध्ये हाती घेण्यात आली होती. परंतु सदर कामे योजनेंतर्गत पूर्ण झाली नाहीत.

(२) नाही.

सिंचन हंगाम सुरू होण्यापूर्वी कालव्याची साफसफाई प्रामुख्याने गाळ व झाडेझुडपे काढणे इत्यादी कामे जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी संघटनेकडून केली जातात.

(३) अंशत: खरे आहे.

सदर कालव्यावरील काही बांधकामे तसेच अस्तरीकरण कामे (Lining) महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत सन २०१०-२०११ मध्ये हाती घेण्यात आली. तथापि, कुंडलिका डावा तीर कालवा, रोहा शाखा कालवा, मोर्बा शाखा कालवा व अष्टमी शाखा कालव्यावरील कामे पूर्ण झाली नसल्यामुळे अष्टमी शाखा व रोहा शाखा कालव्यामार्फ़त सिंचन पाणीपुरवठा करणे शक्य होत नाही.

(४) काळ सिंचन प्रकल्पांतर्गत अष्टमी शाखा कालवा व रोहा शाखा कालवा वगळता इतर कालव्याव्दारे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिंचनासाठी कालव्यातून पाणी सोडण्यात आलेले आहे.

(५) सदर कालव्यावरील काही बांधकामे नियमित देखभाल दुरुस्ती निधीमधून प्रस्तावित करून त्यांच्या निविदा निश्चित झाल्या आहेत. तसेच महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत सदर कालव्यांच्या प्रस्तावित केलेल्या कामांपैकी झालेल्या व उर्वरीत कामांचा एकत्रित आढावा घेऊन त्यानुसार कालव्यातून पूर्ण क्षमतेने सिंचनासाठी पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक कामे विशेष दुरूस्तींतर्गत प्रस्तावित करून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडे शिक्षकांचे प्रश्न प्रलंबित असल्याबाबत

**(७८) * ६५९८ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडे शिक्षकांच्या पदोन्नतीसह, वैद्यकीय देयके व शिक्षण सेवकांचे प्रश्न प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नसतील तर आम्हाला तीव्र आंदोलनाचा पर्याय स्वीकारावा लागेल असा इशारा माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात सांगली येथे पार पडलेल्या शिक्षक भारतीच्या पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शिक्षकांच्या पदोन्नतीसह, वैद्यकीय देयके व शिक्षण सेवकांचे प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

(२) शिक्षक भारतीचे प्रलंबित मागण्यांचे निवेदन दिनांक ०३/०२/२०२१ रोजी जिल्हा परिषद, सांगली कार्यालयास प्राप्त झाले आहे. तथापि, सदर मेळाव्याबाबत अहवाल त्या कार्यालयास प्राप्त नाही.

(३) जिल्हा परिषद, सांगली कार्यालयामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. :-

(अ) ज्या शिक्षणसेवकांचा नियमित वेतनश्रेणीचा कालावधी पूर्ण झालेला आहे त्यांना नियमित वेतनश्रेणी मंजूर केलेली आहे. त्यामुळे शिक्षणसेवकांचे नियमित वेतनश्रेणीबाबतचे प्रस्ताव प्रलंबित नाहीत.

(आ) जानेवारी, २०२१ अखेर एकूण १९२ वैद्यकीय प्रकरणे प्राप्त होती, त्यापैकी १४१ प्रकरणे मंजूर करण्यात आली असून सदर देयके शासनाकडील अनुदान प्राप्त होईल त्या प्रमाणात अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित ५१ प्रकरणांबाबत मंजूरीची कार्यवाही सुरु आहे.

(इ) पदोन्नतीसंदर्भात पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त ९५ पदे तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार भरली आहेत. तसेच बिंदुनामावली पडताळणीची कार्यवाही पूर्ण करुन खुल्या प्रवर्गातील पदोन्नतीची पदे भरण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(ई) शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नासंदर्भात संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी वारंवार बैठका घेऊन प्रलंबित प्रश्न सोडविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) या कार्यालयाची वित्तीय बाबी संदर्भातील निर्णय व अनुषंगिक बाबींच्या तपासणीबाबत

**(७९) * ६६४५ श्री.विलास पोतनीस : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १३ मधील प्रश्न क्रमांक ५९३४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) या कार्यालयाची वित्तीय बाबी संदर्भातील निर्णय व अनुषंगिक बाबींची तपासणी करण्याकरीता दिनांक २६ ऑगस्ट, २०२० रोजीच्या शासन आदेशानुसार प्रधान सचिव, ग्रामविकास यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) या कार्यालयाची तपासणी करून अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने अहवालात केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे व अहवालातील शिफारशींनुसार शासनाने दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) या कार्यालयाची वित्तीय बाबी संदर्भातील निर्णय व अनुषंगिक बाबींची तपासणी करण्याकरीता दिनांक २६ ऑगस्ट, २०२० रोजीच्या शासन आदेशानुसार उप सचिव (वित्त), ग्रामविकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने तपासणी करुन अहवाल शासनास सादर केला आहे.
(३) सदर प्रकरणी समितीने वित्तीय अनियमिततेबाबत अहवाल सादर केला असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंद्राने राज्याला कोरोना रुग्णांच्या उपचारासाठी दिलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(८०) * ७५०३ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी केंद्र शासनाने माहे एप्रिल ते जून, २०२० या कालावधीसाठी ३९३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून सदर निधी खर्च करणे बंधनकारक असतानाही रुपये १४३ कोटी विहित मुदतीत खर्च केले असून रुपये २५० कोटींचा निधी अखर्चित राहिल्याने शासनाने जिल्हाधिकाऱ्यांकडून निधी परत मागविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाने दिलेल्या रुपये ३९३ कोटीपैकी रुपये ३०० कोटी खर्च करणे अपेक्षित असताना निधी अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, बीड जिल्हयात एकूण अनुदान ४.८६ कोटी मंजूर असताना १.८१ कोटी खर्च केला असून उर्वरित १.५९ कोटी अखर्चित निधी केंद्र शासनाकडे जमा करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीचा वापर आरोग्य सुविधांसाठी न करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कारवाई करुन अखर्चित निधी केंद्र शासनाकडे जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे नाही.

निधीचा विनियोग रुग्ण संख्येवर अवलंबून असल्यामुळे रुग्ण संख्येनुसार फेरवाटप करण्यासाठी काही जिल्हयाकडून निधी परत घेण्यात आला आहे.
(३) परत घेतलेला निधी आवश्यकतेनुसार इतर जिल्हयांना फेरवाटप करण्यात आला आहे. केंद्र शासनाकडे जमा करण्यात आलेला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे खाजगी रुग्णालयामध्ये कोविड रूग्णांकडून जादा देयक आकारीत असल्याबाबत

**(८१) * ७३३३ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.जयंत आसगावकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना रुग्णांकडून अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या खाजगी रुग्णालयांवर शासनाने कारवाई करतांना ते बंद न करता पश्चिम बंगाल राज्याप्रमाणे खाजगी रुग्णालयांविरुध्द तक्रारींसाठी आयोग नेमण्याची सूचना मा.उच्च न्यायालयाने शासनाला केली असल्याचे दिनांक २ ऑक्टोंबर, २०२० रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाजगी रुग्णालयांनी अनेक रुग्णांना आकारलेली देयकाची रक्कम ही दीड ते चौदा लाखापर्यंत असून खाजगी रुग्णालयांकडून सहकार्य न मिळाल्यामुळे कित्येक रुग्णांना “महात्मा फुले जन आरोग्य योजना” यासारख्या उपलब्ध विमा योजनेचा उपयोग करून घेता आला नाही, तसेच, खाजगी रुग्णालयांनी आकारलेली भरमसाठ देयकांची रक्कम भरता आली नाही म्हणून काही रुग्णालयांनी रुग्णांचे शवही नातेवाईकांना देण्याचे नाकारले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात विशेषतः नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा व भंडारा जिल्ह्यात खाजगी रूग्णालये कोरोना रूग्णांकडून शासनाने निर्देशित केलेल्या नियमानुसार शुल्क न आकारता अतिरिक्त देयके आकारली असून २५० हुन अधिक तक्रारी महानगरपालिका प्रशासनाकडे नागरिकांनी केल्या असल्याचे दिनांक ८ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने अतिरिक्त देयके आकारणाऱ्या खाजगी रुग्णालयावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक समिती नेमली असून समितीने केलेल्या कार्यवाहीचा तपशिल काय आहे,

(५) असल्यास, महानगरपालिकेने केलेल्या तपासणीत रूग्णालयाकडून ८० टक्के खाटांवर अतिरिक्त दराने देयके वसूली केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोरोनावरील वैद्यकीय उपचारासाठी अतिरिक्त देयके आकारुन सामान्य रुग्णांची लुट करणाऱ्या रुग्णालयांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) यासंबंधी मा.न्यायालयाकडून कोणतीही लिखित सूचना वा लिखित निर्देश या विभागास प्राप्त नाही.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

खाजगी रुग्णालयातून शासनाने निर्देशित केलेल्या नियमानुसार शुल्क न आकारता अतिरिक्त देयके आकारत असल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

नागपूर व चंद्रपूर महानगरपालिकेकडून व भंडारा जिल्ह्यातून तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तथापि, वर्धा व गडचिरोली जिल्ह्यात अशा तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) शासनाने अतिरिक्त देयके आकारणाऱ्या खाजगी रुग्णालयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिका आयुक्त तसेच जिल्हाधिकारी यांना त्यांचेस्तरावर भरारी पथक नेमण्याचे आदेश दिनांक ०७/०८/२०२० रोजी दिलेले आहेत.

तसेच दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० च्या अधिसूचनेनुसार खाजगी रुग्णालयाने पूर्वलेखापरिक्षित देयक देणे, अतिरिक्त देयक आकारल्यास फरकाची रक्कम रुग्णाला परत करणे बंधनकारक आहे अन्यथा अशा दोषी रुग्णालयाचे नोंदणीकरण रद्द करणे तसेच भारतीय दंड संहितेनुसार कारवाईस पात्र राहण्याची तरतूद केली आहे.

नागपूर महानगरपालिका प्रशासनाव्दारे नेमलेल्या समितीला प्राप्त तक्रारींच्या देयकांचे लेखापरिक्षण करुन संबंधित रुग्णास फरकाची अतिरिक्त रक्कम परत करण्यास रुग्णालय धारकास नोटीस बजावण्यात आल्या असून लेखापरिक्षण करुन रुपये ३६,९२,९१२/- रक्कम परतफेड करण्याचे आदेश खाजगी रुग्णालयांना देण्यात आले आहेत.

(४) होय, हे अंशतः खरे आहे.

नागपूर महानगरपालिकासंदर्भात हे खरे असून चंद्रपूर महानगरपालिकेबाबत हे खरे नाही.

(५) अतिरिक्त आकारण्यात आलेल्या देयकातील फरकाची रक्कम संबंधितांस परत करण्याकरीता खाजगी रुग्णा लयधारकास अवगत करुन अनुषंगिक कार्यवाही करण्यात आली.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.सांगरुण (ता.हवेली, जि.पुणे) येथील नदीपात्रावर पादचारी पूलाचे बांधकाम करण्याबाबत

**(८२) * ७९३१ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळा-मुठा नद्यांच्या संगमावर वसलेल्या मौ.सांगरुण (ता.हवेली, जि.पुणे) येथून पुणे जिल्हा परिषदेमार्फत मौजे सोनापूर मार्गे पानशेत धरण (पर्यटन स्थळ) क्षेत्राकडे जाण्या-येण्यासाठी तेथील ग्रामस्थ व नागरिकांच्या सोईसाठी नदीपात्रातून नावेची (होडी) सुविधा करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेने सदर नावेची सुविधा गेल्या चार वर्षापासून बंद केल्यामुळे मुळा-मुठा नदीच्या अलिकडील व पलिकडील ग्रामस्थ व अन्य नागरिकांना पानशेतकडे जाण्या-येण्यासाठी खडकवासला मार्गे एसटी बसने किंवा पायी प्रवास करावा लागत असल्याने त्यांना आवश्यक ती सुविधा देण्यात यावी अशा आशयाचे निवेदन दिनांक १४ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौ.सांगरुण ते मौ.सोनापूर या दरम्यानच्या नदीपात्रावर दोन्ही बाजूंनी तारेच्या कुंपनाने झाकलेला कायमस्वरुपी पादचारी पूल बांधण्यात यावा अशी मागणी तेथील ग्रामस्थ व नागरिकांनी मा.ग्रामविकास मंत्री, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, पुणे व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हवेली यांचेकडे दिनांक ३ व ७ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे पुन्हा मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) मौजे सांगरुण व मौजे सोनापूर ही गावे खडकवासला धरणाच्या बुडीत क्षेत्रालगत वसलेली आहेत. दोन्ही गावांच्या मध्ये जलाशय असून जलाशयामधून सरळ अंतर १.०० कि.मी. आहे. सदर गावांना जोडण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचायत सोनापूर व सांगरुण यांना होड्या पुरविण्यात आलेल्या आहेत. तथापि, कुशल ऑपरेटर नसल्याने सदर होड्या बंद आहेत.

सोनापूर व सांगरुण गावांना जलाशयातून सरळ जोडण्यासाठी पूल बांधावयाचा झाल्यास अंदाजे रुपये ६०.०० कोटी व दोन पदरी पूल बांधकामासाठी अंदाजे रुपये १५०.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. जिल्हा परिषदेकडे एवढया मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होऊ शकत नाही.

सदर स्थळापासून मौजे सांगरुण व सोनापूर गावांना जोडण्यासाठी अपस्ट्रीम बाजूस ६.०० कि.मी. अंतरावर व डाऊनस्ट्रीम बाजूस १०.०० कि.मी. अंतरावर वाहतुकीसाठी चांगले डांबरी पर्यायी रस्ते उपलब्ध आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ तालुक्यातील तीस अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारत नसल्याबाबत

**(८३) * ७३१४ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ तालुक्यातील तीस अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारत नसल्याने या अंगणवाड्या समाज मंदिर व जिल्हा परिषद शाळेत भरवल्या जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यवतमाळ तालुक्यात अंगणवाड्यांना इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) व (२) हे खरे आहे.

यवतमाळ तालुक्यात एकूण ३९ अंगणवाडी केंद्रांना स्वतंत्र इमारती नाहीत. त्यापैकी १० अंगणवाड्या जिल्हा परिषद शाळेत, ७ अंगणवाड्या भाडेतत्वावर व २२ अंगणवाड्या समाज मंदिर व इतर ठिकाणी भरत आहेत.

अंगणवाडी इमारती स्वतंत्र नसलेल्या या ३९ अंगणवाड्यांपैकी सन २०१८-२०१९ मध्ये ११ इमारतीचे बांधकामे मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी १० कामे पूर्ण झाली आहेत व १ काम प्रगतीपथावर आहे. सन २०१९-२०२० मध्ये १६ इमारतीचे बांधकामे मंजूर करण्यात आली होती, त्यापैकी ९ कामे पूर्ण झाली आहेत व ७ कामे प्रगती पथावर आहेत. त्यानुसार एकूण १९ बांधकाम पूर्ण झालेली आहेत व ती ताब्यात घेऊन त्याठिकाणी अंगणवाडी केंद्र सुरू करण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच उर्वरित अंगणवाडी इमारतीचे बांधकामे सन २०२०-२०२१ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हा परिषदेतील अधिकारी संवर्गातील पदे रिक्त असल्याबाबत

**(८४) * ६९८७ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हा परिषदेतील वर्ग-१ व वर्ग-२ या अधिकारी संवर्गातील पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२० च्या माहितीनुसार अकोला जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ व वर्ग-२ या अधिकारी संवर्गातील २४९ मंजूर पदांपैकी ७८ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्हा परिषदेमध्ये शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, वैद्‌यकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, नरेगा ही महत्वाची पदे रिक्त असल्यामुळे तीन जिल्हा परिषदेमध्ये अधिकारी यांच्यावर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वर्ग-१ व वर्ग-२ या अधिकारी संवर्गातील पदे रिक्त असल्यामुळे शासनाकडून प्राप्त होत असलेल्या निधीचे नियोजन करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्हा परिषदेतील वर्ग-१ व वर्ग-२ या अधिकारी संवर्गातील पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) होय.
(५) ग्रामविकास विभागाकडून संबंधित विभागांना व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना, सर्व प्रचलित नियमांचे व शासनाने/न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करुन, जिल्हा परिषद, अकोला, वाशिम व बुलढाणा येथील रिक्त पदे भरण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.
(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नागरी आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(८५) * ६९०५ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रशांत परिचारक** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नागरी आरोग्य केंद्रात २७५४ पदे रिक्त असल्याची बाब दिनांक २० डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे कधीपर्यंत भरण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने राज्यातील नागरी आरोग्य कैंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत रिक्त असलेली कंत्राटी पदे दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत भरण्याबाबत सर्व जिल्हे व महानगरपालिका यांना कळविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हा परिषदेतील विविध संवर्गातील पदे रिक्त असल्याबाबत

**(८६) * ७१६३ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हा परिषदेतील वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ या संवर्गातील सरळसेवा भरतीतील व पदोन्नतीची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२० च्या माहितीनुसार परभणी जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-३ व वर्ग-४ या सरळसेवा भरतीतील ९५० पदे रिक्त असून शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, वैद्यकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, नरेगा ही महत्वाची पदे रिक्त असल्यामुळे जिल्हा परिषदेमध्ये अधिकारी/कर्मचारी यांच्यावर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ या अधिकारी/कर्मचारी संवर्गातील पदे रिक्त असल्यामुळे शासनाकडून प्राप्त होत असलेल्या निधीचे नियोजन करता येत नसून समन्वय साधता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने परभणी जिल्हा परिषदेतील वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ या अधिकारी/कर्मचारी संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) ग्रामविकास विभागाकडून संबंधित विभागांना व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना, सर्व प्रचलित नियमांचे व शासनाने/न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करुन, जिल्हा परिषद, परभणी येथील रिक्त पदे भरण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.